शुक्रवार
०६
नोव्हेंबर २०२६

वर्ष १९ वे
अंक - २७०
पाने - १२
किंमत - ८ रूपये

- Web : www.yuvavarta.in/com
- Mail : dailyyuvavarta@gmail.com

दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

- RNI No. MAHMAR/2007/24252

पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

PBM Jeweller's

गानकः पथप्रदर्शकः
हॉलमार्क प्रमाणित
AN ISO 9001:2008
GOVT. APPROVED VALUER

सर्व सोन्याचे दागिने
HUID हॉलमार्क प्रमाणित





दीपावली
निमित्त आता मजुरी
फक्त 4%
पासून सुरूवात

*नियम व अटी लागू

धनत्रयोदशीच्या



सर्व ग्राहकांना व
हितचिंतकांना
हार्दिक शुभेच्छा !



मे.पोपट भगिरथ महाले
ज्वेलर्स (सराफ)

•विश्वास •शुध्दता •विविधता.

अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर

7599996999 | 8265036807 Follow us on :



दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28



अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २७०। किंमत - ८ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - डॉ. सुदीप किसन हासे (एम.ई. पीएच. डी.) | शुक्रवार ०६/११/२०२६







आदर्श स्वच्छ व सुंदर संगमनेरची संकल्पना पूर्णत्वाकडे - मा. मंत्री थोरात

संगमनेर होणार धूळमुक्त; दोन अत्याधुनिक स्वीपिंग मशीनसह वाहनांचा ताफा दाखल



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर हे विकसित व वैभवशाली शहर आहे. नागरिकांना चांगल्या व आधुनिक सुविधा देण्याबरोबर शहरांमध्ये स्वच्छतेची संस्कृती निर्माण झाली आहे. सार्वजनिक स्वच्छतेमध्ये नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असून नगर परिषदेने नवीन अत्याधुनिक वाहने सेवेत दाखल करून घेतल्याने आदर्श स्वच्छ व सुंदर संगमनेर शहराची संकल्पना पूर्णत्वाकडे जात असल्याचे प्रतिपादन राज्याचे माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले असून नगरपरिषदेच्या कामाचे कौतुक केले आहे.

यशोधन कार्यालय येथे संगमनेर नगरपालिकेच्या वतीने एक पणती स्वच्छतेची या उपक्रमांतर्गत २ स्वीपिंग मशीन, १० नवीन घंटागाडी, ५ जुन्या घंटागाडींचे रिवेनेशन, चार ट्रॅक्टर, दोन इतर वाहने अशा सुमारे ५ कोटींच्या वाहनांचे लोकार्पण दीपावलीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आमदार सत्यजित तांबे, मा.आ. डॉ सुधीर तांबे, नगराध्यक्ष डॉ. सौ. मैथिलीताई तांबे, डॉ जयश्रीताई थोरात, उपनगराध्यक्ष नूरमोहम्मद शेख, डॉ संजय मालपाणी, माजी नगराध्यक्ष दिलीपराव पुंड, विश्वासराव मुर्तडक, कैलास लोणारी, अरुण वाकचौरे, सभापती किशोर टोकसे, सौरभ कासार, नगरसेवक शैलेश कलंत्री, गजेंद्र अभंग, नितीन अभंग, किशोर पवार, गणेश गुंजाळ, मुजीब खान पठाण, अमजद खान पठाण, भारत बोऱ्हाडे, मालती डाके, शोभा पवार, सीमा खटाटे, अर्चना दिघे, श्रीमती विजया गुंजाळ, डॉ. अनुराधा सातपुते, प्राची काशीद, दिपाली पांचारिया, सरोजना पगडाल, प्रियंका शहा, नंदा गरुडकर, मुख्याधिकारी डॉ. दयानंद गोरे, उपमुख्य अधिकारी संजय पेकळे, सोमेश्वर दिवटे, अजय फटांगरे, निखिल पापडेजा, ॲड. संग्राम जोंधळे, यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, मा.आ डॉ सुधीर तांबे यांच्या नगराध्यक्ष पदापासून आदर्शवत कामाची परंपरा सुरू झाली. सर्व नगरसेवक ,उपनगराध्यक्ष यांनी चांगले काम केले. सौ दुर्गाताई तांबे यांच्या काळामध्ये स्वच्छतेवर मोठे काम झाले म्हणून राज्य व राष्ट्रीय पातळीवर अनेक बक्षिसे संगमनेर नगरपालिकेला मिळाली. शिस्त व स्वच्छतेची संस्कृती संगमनेर शहरांमध्ये निर्माण झाली. नव्याने नगरपालिकेच्या सेवेत दाखल झालेल्या वाहनांच्या माध्यमातून धुळमुक्त व स्वच्छ संगमनेर साठी अधिक काम होणार आहे. शहरांमध्ये मूलभूत सुविधा चांगल्या असून नागरिकांना मुबलक पाणी आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणी जपून वापरण्याचे आवाहन करताना सार्वजनिक स्वच्छतेमध्ये सर्वांनी सहभाग घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले. याचबरोबर दीपावलीच्या निमित्ताने शहर स्वच्छतेसाठी नगरपालिकेने घेतलेल्या उपक्रम कौतुकास्पद असल्याचे ते म्हणाले.

तर आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, मागील ९ महिन्यांमध्ये २.० अंतर्गत सातत्याने नवनवीन उपक्रम राबविण्यात आले आहेत. एक पणती स्वच्छतेची यामधून दोन स्वीपिंग मशीन मिळाले आहेत. मुख्यमंत्री तसेच महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे अध्यक्ष यांच्या सहकार्यातून राज्यातून संगमनेर नगरपालिकेला पहिले २.५ कोटींचे स्वीपिंग मशीन मिळाले आहे. याची पुढील ५ वर्षे जबाबदारी सरकारची असणार आहे. स्वच्छतेसाठी नव्याने कोणार्क कंपनीला ठेका देण्यात आले आहे. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी पाहिलेले स्वच्छ व सुंदर संगमनेरचे स्वप्न यामधून साकार होणार आहे. दिवस-रात्र काम करून जनतेचा पैसा आम्ही वाचवतो .सातत्याने वेगवेगळ्या माध्यमातून निधी मिळवतो. नवीन भाजी मार्केट सुरू झाली आहे. नऊ ठिकाणी फूड कोर्ट उभे झाले आहे. आगामी काळामध्ये शून्य टक्के कचरा व सौर ऊर्जा प्रकल्प उभारून ०% विज बिल करण्याचा निर्धार असल्याचे संगत नव्याने राबवण्याच्या विविध योजनांबाबत त्यांनी माहिती दिली. मा. आ.डॉ.सुधीर तांबे म्हणाले की, नवीन स्वीपिंग मशीनच्या माध्यमातून ४० किलोमीटर रस्ता स्वच्छतेचे काम एका दिवसात होणार आहे .यामुळे स्वच्छ शहर अशी ओळख निर्माण होईल. या अभियानामध्ये विद्यार्थ्यांनी स्वच्छता दूत म्हणून काम करावे असे आवाहन त्यांनी केले.

तर सौ दुर्गाताई तांबे म्हणाल्या की , मागील नगराध्यक्षांचे काम परंपरा आपण पुढे नेली.दादांनी स्वच्छ संगमनेर ,सुंदर संगमनेर ,गार्डन सिटी हे स्वप्न पाहिले ते पूर्ण करण्याचे काम आपण केले. ओला कचरा व सुका कचरा ही संस्कृती जनतेमध्ये रुजवली. केंद्र व राज्य सरकारची अनेक बक्षिसे मिळाली राष्ट्रपतींकडून १० कोटीचे बक्षीस तर अमिताभ बच्चन यांच्या हस्ते ही सन्मान झाला. नव्याने ३७ गार्डन शहरांमध्ये निर्माण केली आहेत या सर्व कामांमध्ये सर्व सफाई कर्मचारी व नागरिकांचाही मोठा सहभाग राहिला असल्याच्या त्या म्हणाल्या

डॉ. मैथिलीताई तांबे म्हणाल्या की , लोकनेते बाळासाहेब थोरात , आमदार सत्यजित तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपालिका नागरिकांना जास्तीत जास्त चांगल्या सुविधा देत आहे. सुमारे पाच कोटींची विविध वाहने स्वच्छतेसाठी काम करणार असून पहाटपासून स्वच्छता कर्मचारी काम करतात या सर्व कामांमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

विरोधकांच्या बुद्धीची कीव येते - आमदार तांबे

संगमनेर मधील धूळ मुक्तीसाठी मुख्यमंत्री महोदयांच्या मदतीमधून राज्यांमधून फक्त संगमनेर शहरासाठी २.५ कोटींचे स्वीपिंग मशीन आले. मशीन निधी याबाबत विरोधकांना माहिती सुद्धा नाही. मशीन आल्यावर हे जागे झाले. आम्ही जनतेसाठी काम करतो. फुकटच्या कामाचे श्रेय घेऊ नका. सोशल मीडियाच्या माध्यमातून चुकीच्या गोष्टी पसरवणाऱ्या विरोधकांच्या बुद्धीची कीव येते असे सांगताना निधी कसा आणायचा व चांगली विकास कामे करण्याचे आम्हाला चांगले ठाऊक असल्याचे आमदार सत्यजित तांबे यांनी सांगितले असून यावेळी विरोधकांना ठणकावले आहे.







Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

शुक्रवार
०६
नोव्हेंबर २०२६

वर्ष १९ वे
अंक - २७०
पाने - १२
किंमत - ८ रूपये

- Web : www.yuvavarta.in/com
- Mail : dailyyuvavarta@gmail.com

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

- RNI No. MAHMAR/2007/24252

पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28



दंडे गोल्ड & डायमंडस्

सण नात्यांचा, उत्सव सुवर्णक्षणांचा

सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर
50% पर्यंत सूट

हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मजुरीवर
100% पर्यंत सूट

15 नोव्हेंबर पर्यंत | हॉलमार्क दागिने बदलतांना 0% घट

नाशिक 9175694300 | नाशिक रोड 7774084019 | संगमनेर 9156009908 | सिन्नर 8983275498

संपादकीय...

दिवाळी अंकांची मेजवानी; साहित्यविश्वाचा वैचारिक दीपोत्सव!

दिवाळी हा केवळ दिव्यांचा, फराळाचा आणि आनंदोत्सवाचा सण नाही, तर तो नव्या विचारांचा, नव्या संकल्पांचा आणि सांस्कृतिक समृद्धीचा उत्सव आहे. घराघरांत दिव्यांची रोषणाई होत असताना मनाच्या कोपऱ्यातही ज्ञानाचा, विचारांचा आणि साहित्याचा दीप प्रज्वलित व्हावा, हीच दिवाळीची खरी भावना आहे. याच भावनेतून दरवर्षी प्रकाशित होणारे दिवाळी अंक मराठी साहित्यविश्वातील एक महत्त्वाचे सांस्कृतिक वैशिष्ट्य बनले आहेत. दिवाळी अंक म्हणजे वाचकांसाठी केवळ मनोरंजनाचे साधन नव्हे, तर वैचारिक मेजवानी आणि साहित्याची अनमोल पर्वणीच! मोबाईलच्या एका क्लिकवर जगभरातील माहिती उपलब्ध होण्याच्या आजच्या डिजिटल युगात वाचनसंस्कृतीसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. सोशल मीडिया, रील्स, व्हिडिओ आणि क्षणाक्षणाला बदलणाऱ्या माहितीच्या प्रवाहात माणसाचे वाचन कमी होत चालले आहे. माहितीचा प्रचंड साठा उपलब्ध असला, तरी त्यातून ज्ञान किती मिळते, विचारांची प्रगल्भता किती वाढते आणि समाजभान किती विकसित होते, हा खरा प्रश्न आहे. अशा परिस्थितीत दिवाळी अंकांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. कारण दिवाळी अंक वाचकाला केवळ माहिती देत नाहीत, तर त्याला विचार करायला, प्रश्न विचारायला आणि समाजाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहायला शिकवतात. मराठी दिवाळी अंकांची परंपरा समृद्ध आणि वैभवशाली आहे. या परंपरेने अनेक लेखक, कवी, विचारवंत, पत्रकार आणि साहित्यिकांना अभिव्यक्तीचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. कथा, कादंबरी, कविता, ललित लेख, विनोदी लेखन, प्रवासवर्णने, वैचारिक लेख, व्यक्तिचित्रे, संशोधनपर लेख आणि सामाजिक विषयांची अभ्यासपूर्ण मांडणी अशा विविध साहित्यप्रकारांनी दिवाळी अंक समृद्ध झाले आहेत. अनेकदा एखाद्या दिवाळी अंकातील लेख समाजाच्या विचारविश्वाला नवी दिशा देतो, तर एखादी कथा मनाच्या खोल कप्प्यात कायमची घर करून राहते. काही लेख वाचकाला अंतर्मुख करतात, तर काही लेख प्रस्थापित व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचे धाडस देतात. दिवाळी अंकांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची विषयवैविध्यता. इतिहासातील दुर्लक्षित घटनांपासून वर्तमानातील राजकीय घडामोडींपर्यंत, अर्थव्यवस्थेतील बदलांपासून विज्ञान-तंत्रज्ञानातील नव्या संशोधनापर्यंत, आरोग्यविषयक जागृतीपासून सामाजिक प्रश्नांपर्यंत अनेक विषयांचा सखोल वेध या अंकांमधून घेतला जातो. त्यामुळे दिवाळी अंक हे केवळ साहित्याचे संकलन न राहता समाजजीवनाचा आरसा बनतात. वाचकाला आपल्या सभोवतालच्या जगाचे आकलन करून देण्याचे महत्त्वपूर्ण काम ते करतात. आजच्या काळात समाजासमोर अनेक गंभीर प्रश्न आहेत. बेरोजगारी, महागाई, शेतीसमोरील संकटे, पर्यावरणाचा ऱ्हास, बदलते कौटुंबिक संबंध, शिक्षणातील आव्हाने, राजकीय ध्रुवीकरण आणि सोशल मीडियावर पसरणाऱ्या अफवा अशा असंख्य विषयांवर वस्तुनिष्ठ आणि अभ्यासपूर्ण चर्चा होण्याची गरज आहे. या विषयांकडे केवळ भावनिक दृष्टिकोनातून न पाहता त्यांची कारणमीमांसा करणे, विविध बाजू समजून घेणे आणि विधायक पर्याय सुचवणे आवश्यक आहे. दर्जेदार दिवाळी अंक ही जबाबदारी समर्थपणे पार पाडू शकतात. त्यासाठी लेखकांनी अभ्यासपूर्ण लेखन करणे आणि संपादकांनी निर्भीड, संतुलित व गुणवत्तापूर्ण साहित्याला प्राधान्य देणे गरजेचे आहे.

श्री श्री रविशंकर विद्या मंदिरच्या मुलींची विभागीय क्रिकेट स्पर्धेत ऐतिहासिक हॅट्रिक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : शालेय क्रीडा व युवक संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने आयोजित १७ वर्षांखालील मुलींच्या विभागीय क्रिकेट स्पर्धेत सुमेरू एज्युकेशन सोसायटी संचलित श्री श्री रविशंकर विद्या मंदिर स्कूलच्या मुलींनी उल्लेखनीय कामगिरी करत विभागीय विजेतेपद पटकावले. अकलूज येथे पार पडलेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पुणे ग्रामीण संघावर मात करत शाळेच्या संघाने अजिंक्यपद मिळवले. विशेष म्हणजे, सलग तिसऱ्या वर्षी विभागीय विजेतेपद मिळवत संघाने ऐतिहासिक हॅटट्रिक साधली आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे संगमनेरच्या क्रीडा क्षेत्रात शाळेने मानाचा नवा विक्रम प्रस्थापित केला असून संपूर्ण तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

'खेळाडूंची जिद्द यशाची परंपरा!' या ध्येयवाक्याला साजेशी कामगिरी करत श्री श्री रविशंकर क्रिकेट अकादमीच्या खेळाडूंनी मैदानावर आपल्या कौशल्याची चमक दाखवली. अकादमीच्या माध्यमातून मिळणारे नियमित व दर्जेदार प्रशिक्षण, सरावातील सातत्य आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन यांचा या यशात मोलाचा वाटा आहे. स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच मुलींनी भेदक गोलंदाजी, शिस्तबद्ध फलंदाजी आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षणाच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांना कडवी झुंज दिली. निर्णायक क्षणी दाखवलेली मानसिक खंबीरता, आत्मविश्वास आणि संघभावना यांमुळे संघाला हे यश संपादन करता आले.

या यशामागे शाळेचे क्रीडा प्रशिक्षक योगेश खरात, अदीप वाघ, प्रथमेश हासे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन व अथक परिश्रम लाभले. खेळाडूंची तांत्रिक कौशल्ये विकसित करण्याबरोबरच त्यांच्यामध्ये शिस्त, आत्मविश्वास, खिलाडूवृत्ती आणि संघभावना रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य प्रशिक्षकांनी केले. त्यांच्या नियोजनबद्ध प्रशिक्षणाचे आणि खेळाडूंच्या मेहनतीचे फलित म्हणजे हे सलग तिसरे विभागीय विजेतेपद होय.

या ऐतिहासिक यशाबद्दल सुमेरू एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापिका श्रीमती स्वाती शाह, सेक्रेटरी श्री. समीर शाह, प्राचार्या श्रीमती आरती सप्रा, उपप्राचार्या श्रीमती ज्योतिर्मया चव्हाण तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी खेळाडूंचे आणि मार्गदर्शक प्रशिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

आगामी राज्यस्तरीय स्पर्धेतही मुली असाच दमदार खेळ करून यशाची परंपरा कायम राखतील, असा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या विजयामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील वाटचालीला नवी ऊर्जा मिळाली असून भविष्यातही अनेक गुणवंत खेळाडू घडविण्याचा आत्मविश्वास अधिक दृढ झाला आहे. श्री श्री रविशंकर विद्यामंदिर स्कूलच्या या विजयी मुलींनी आपल्या जिद्दीने, मेहनतीने आणि सांघिक कामगिरीने संगमनेरच्या क्रीडा इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल असा नवा अध्याय लिहिला आहे!

यात खेळाडूंची नावे टाकायची असतील तर टाकता येतील.

निता सावंत यांची 'आयडॉल टीचर' पुरस्कारासाठी निवड



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धांदरफळ खुर्द येथील विद्यार्थीप्रिय व उपक्रमशील शिक्षिका श्रीमती निता शिवाजी सावंत यांची महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्यावतीने दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या 'आयडॉल टीचर २०२६-२७' पुरस्कारासाठी निवड झाली आहे. त्यांच्या शैक्षणिक योगदानाची दखल घेत झालेल्या या निवडीमुळे धांदरफळ खुर्दसह संगमनेर तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंद व्यक्त होत आहे.

निता सावंत या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत शिक्षण अधिक आनंददायी, कृतीशील आणि गुणवत्तापूर्ण करण्यासाठी सातत्याने विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवितात. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे आणि व्यक्तिमत्त्व विकास घडविणे यासाठी त्या विशेष प्रयत्नशील असतात. स्वतः उत्तम खेळाडू असल्याने विद्यार्थ्यांमध्ये क्रीडागुण, जिद्द, चिकाटी आणि खिलाडूवृत्ती विकसित करण्यासाठीही त्या सातत्याने मार्गदर्शन करतात. शिष्यवृत्ती परीक्षा, स्पर्धा परीक्षा तसेच विविध शैक्षणिक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी यश संपादन करावे, यासाठी त्यांची मेहनत महत्त्वपूर्ण ठरत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी तालुका व जिल्हास्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

शैक्षणिक तळमळ, कल्पकता, कर्तव्यनिष्ठा आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली आत्मीयता या गुणांमुळे सावंत मॅडम यांनी शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल संगमनेरचे गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, शिक्षण विस्तार अधिकारी पंकज कवडे, केंद्रप्रमुख रेणुका बाले, तालुक्यातील सर्व विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख, शालेय व्यवस्थापन समिती, पालक, ग्रामस्थ तसेच शिक्षक बांधवांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पाहिजेत
ड्रायव्हर कम हेल्पर पाहिजे
आत्मशांती टी सेंटर
(सपट चहा)
नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

Yuvavarta.in
VISIT
INSTAGRAM

पाहिजेत
गरजू व अनुभवी
साईट इंजिनीअर,
सुपरवायझर व
ऑफिस असीस्टंट पाहिजेत
- संपर्क -
चिंतामणी डेव्हलपर्स
7741057560

पाहिजेत
ड्रायव्हर - २ जागा
आकर्षक वेतन
अर्जासह समक्ष भेटणे
श्री बलदेव कन्स्ट्रक्शन
इनसाईड कांकरेज कॉर्नर
गणेशनगर, संगमनेर
- संपर्क -
8308015324

सिद्धार्थ एंटरप्राईजेस
कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड संगमनेर
पाहिजेत
एका नामांकित पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१
एमबीए असल्यास प्राधान्य
ऑफिस असिस्टंट -१
कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक
कार ड्रायव्हर - १
अनुभव असल्यास प्राधान्य
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

पाहिजेत
श्री मारूती देवस्थान
माळी समाज पंच ट्रस्ट,
माळीवाडा, ता. संगमनेर
संस्थेसाठी व्यवस्थापक नेमणे आहे.
संगणक ज्ञान
आवश्यक, निर्व्यसनी
9850387044
9623469373

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
MOHAMMAD ABUBAKAR KASHIB
NEW NAME AS
MOHAMMAD ABUBAKAR KASHIB
ADDRESS - SAMNAPUR
TAL - SANGAMNER

आकाश कंदील लावण्याची परंपरा कशी सुरू झाली ?



अंधारावर प्रकाशाचा विजय, आनंदाचे स्वागत आणि घराघरांत मांगल्याची भावना निर्माण करणारी आकाशकंदिलांची परंपरा आजही कायम

दिवाळी म्हटले की डोळ्यांसमोर सर्वप्रथम येते ती घराघरांत लावलेली पणती, रंगीबेरंगी रांगोळी, आकर्षक रोषणाई आणि घराच्या प्रवेशद्वारावर डौलाने लटकणारा आकाशकंदील. दिवाळीच्या दिवसांत बाजारपेठांमध्ये विविध आकारांचे, रंगांचे आणि आकर्षक रचनांचे आकाशकंदील पाहायला मिळतात. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकालाच आकाशकंदील खरेदी करण्याचा आणि तो घराबाहेर लावण्याचा उत्साह असतो. मात्र, दिवाळीत आकाशकंदील लावण्याची परंपरा नेमकी कशी सुरू झाली आणि त्यामागील सांस्कृतिक महत्त्व काय आहे, याबाबत अनेकांना उत्सुकता असते.

आकाशकंदील लावण्यामागे प्रामुख्याने प्रकाश, आनंद आणि मांगल्याचे प्रतीकात्मक महत्त्व आहे. दिवाळी हा अंधारावर प्रकाशाचा आणि वाईटावर चांगल्याच्या विजयाचा संदेश देणारा सण मानला जातो. घरातील अंधार दूर करून सर्वत्र प्रकाश निर्माण करणे, सकारात्मकतेचे स्वागत करणे आणि आनंदाचे वातावरण तयार करणे, या भावनेतून दिवाळीमध्ये दिव्यांची आरास केली जाते. याच प्रकाशपरंपरेचा एक सुंदर भाग म्हणजे आकाशकंदील.

रामायणाशी जोडली जाणारी परंपरा

आकाशकंदिलांच्या परंपरेविषयी एक लोकप्रिय सांस्कृतिक समजूत भगवान श्रीरामांच्या अयोध्येत परतण्याच्या प्रसंगाशी जोडली जाते. रामायणानुसार, चौदा वर्षांचा वनवास संपवून भगवान श्रीराम, माता सीता आणि लक्ष्मण अयोध्येत परतले, तेव्हा अयोध्यावासीयांनी त्यांचे स्वागत करण्यासाठी संपूर्ण नगरी दिव्यांनी उजळून टाकली होती. घराघरांत दिवे लावून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. या प्रकाशोत्सवातून दिवाळी साजरी करण्याची परंपरा अधिक दृढ झाली, अशी धार्मिक मान्यता आहे. आकाशकंदील लावण्याची आजची प्रथा या व्यापक दीपोत्सवाच्या सांस्कृतिक परंपरेशी जोडून पाहिली जाते.

आकाशकंदिलाचे प्रतीकात्मक महत्त्व

आकाशकंदील हा केवळ घर सजवण्याचा एक घटक नाही, तर तो आनंद, आशा आणि सकारात्मकतेचे प्रतीक मानला जातो. घराच्या बाहेर उंचावर लावलेला आकाशकंदील दूरवरूनही दिसतो. त्यामुळे तो उत्सवाचे वातावरण निर्माण करतो. पूर्वीच्या काळात मातीच्या पणत्या आणि तेलाचे दिवे हेच प्रकाशाचे प्रमुख साधन होते. कालांतराने कागद, बांबू, रंगीत कापड आणि इतर सजावटीच्या साहित्यापासून आकाशकंदील तयार करण्याची कला विकसित झाली.

बदलत्या काळानुसार बदलले आकाशकंदिलाचे स्वरूप

पूर्वी घरातील सदस्य एकत्र येऊन रंगीत कागद, बांबूच्या काड्या आणि दोऱ्यांच्या साहाय्याने स्वतः आकाशकंदील तयार करत असत. त्यातून मुलांच्या कल्पकतेला वाव मिळत असे आणि कुटुंबातील सदस्यांमध्ये एकत्रित काम करण्याची भावना निर्माण होत असे. आज बाजारपेठेत पारंपरिक कंदिलांसोबतच आधुनिक एलईडी आकाशकंदील, कापडी कंदील, प्लास्टिकचे सजावटी कंदील आणि विविध आकर्षक डिझाइन उपलब्ध आहेत. ऑनलाइन खरेदीमुळेही आकाशकंदिलांची बाजारपेठ विस्तारली आहे. मात्र, आधुनिकतेच्या या प्रवासात पारंपरिक आकाशकंदील तयार करणाऱ्या कारागिरांचे महत्त्व विसरता कामा नये. स्थानिक कलाकार आणि लघुउद्योजकांकडून आकाशकंदील खरेदी केल्यास त्यांच्या व्यवसायाला आर्थिक आधार मिळू शकतो. पर्यावरणपूरक साहित्यापासून तयार केलेल्या कंदिलांना प्राधान्य देणेही आवश्यक आहे.

परंपरा जपूया, प्रकाशाचा संदेश देऊया!

दिवाळीतील आकाशकंदील ही केवळ सजावटीची वस्तू नसून भारतीय संस्कृतीतील प्रकाशोत्सवाची सुंदर अभिव्यक्ती आहे. काळ बदलला, तंत्रज्ञान बदलले आणि सजावटीच्या पद्धतीही बदलल्या; मात्र आकाशकंदील लावण्यामागील आनंद आणि उत्साह आजही कायम आहे. घराच्या दारात लावलेला आकाशकंदील आपल्याला अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा आणि जीवनात आशा, आनंद व सकारात्मकता जपण्याचा संदेश देतो.

ग्रामीण भागात आकाशकंदील लावण्याची परंपरा आजही मोठ्या उत्साहाने जपली जाते. पूर्वी गावातील घरोघरी बांबूच्या काड्या, रंगीत कागद आणि हाताने तयार केलेले कंदील लावले जात असत. अनेक ठिकाणी दिवाळीच्या आधीच घरातील लहान मुले आणि तरुण मंडळी एकत्र येऊन आकाशकंदील तयार करण्याची तयारी करत असत. या निमित्ताने कुटुंबातील सदस्यांमध्ये आपुलकी वाढत असे आणि मुलांना पारंपरिक कला शिकण्याची संधी मिळत असे. आज बाजारात तयार कंदिलांचे अनेक प्रकार उपलब्ध असले, तरी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या आकाशकंदिलाचा आनंद वेगळाच असतो. त्यामुळे आधुनिकतेचा स्वीकार करताना हातकलेचा हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आजच्या काळात आकाशकंदील तयार करताना पर्यावरणाचाही विचार होणे आवश्यक आहे. प्लास्टिक आणि थर्माकोलपासून बनविलेल्या सजावटीच्या वस्तूंमुळे पर्यावरणाचे नुकसान होते. त्यामुळे कागद, कापड, बांबू आणि इतर नैसर्गिक साहित्यापासून तयार केलेल्या आकाशकंदिलांना प्राधान्य देण्याची गरज आहे.





रिक्त पदे भरणे आहे
MYCITYHUB GLOBAL PRIVATE LIMITED, sangamner
• बिझनेस एक्झिक्युटिव्ह – ४
• कार्यालयीन प्रशासक – १
• आयटी प्रोफेशनल – १
• संगमनेर, अकोले तालुका प्रतिनिधी प्रत्येकी - १
पात्रता १२ वी किंवा पदवीधर, संगणक ज्ञानवेतन व इतर सुविधा २० ते २५ हजार+ इन्सेंटिव्ह
Contract -
mycityhubglobal@gmail.comMob- 9970473161

कामगार भरती
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

फ्लॅट विकणे आहे!
फ्लोरा टाउनशिप, घुलेवाडी निशिगंध अपार्टमेंटमध्ये पहिल्या मजल्यावरील तीन बाल्कनीचा प्रशस्त फ्लॅट विकणे आहे.
क्षेत्रफळ : १०२० चौ. फूट
कार पार्किंगची सुविधा
अपेक्षित किंमत : २७ लाख रुपये, किंमत वाटाघाटीनुसार ठरविण्यात येईल.
- संपर्क -
8379064040

शुक्रवार
०६
नोव्हेंबर २०२६

वर्ष १९ वे
अंक - २७०
पाने - १२
किंमत - ८रूपये

- Web : www.yuvavarta.in/com
- Mail : dailyyuvavarta@gmail.com

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

- RNI No. MAHMAR/2007/24252

पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

चंदुकाका सराफ™
SINCE 1827
Jewellers Loved Across Generations
200 YEARS OF TRUST
उत्सव नात्यांचा
200 SINCE 1827
बक्षिसे
जिंकण्याची
सुवर्णसंधी
आणि
बरेच काही...
फ्लॅट 6.99%* घडणावळ सोन्याच्या दागिन्यांवर
0%* घडणावळ हिऱ्यांच्या दागिन्यांवर
*नियम व अटी लागू. दाखवलेली छायाचित्रे केवळ प्रतिकात्मक आहेत.
आपणांस व आपल्या परिवारास
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
UP TO ₹6,000 CASHBACK# SBI card
#Min. Trxn.: ₹50,000; Max. Cashback: ₹6,000 per card account;
Validity: 05 Nov - 11 Nov 2026. T&C Apply.
View our Legacy Film
महाराष्ट्र: बारामती | बारामती एम. आय. डी. सी | पुणे: चंदननगर, हडपसर, तळेगाव दाभाडे, आणि चाकण
अहिल्यानगर: सथ्था कॉलनी आणि सावेडी | फलटण | इंदापूर | अकलूज | पंढरपूर
सोलापूर | संगमनेर | नाशिक | पनवेल | बीड | नातेपुते | धुळे | जालना | कर्नाटक: कलबुर्गी
www.chandukakasaraf.in | TOLL FREE 1800 267 8555
View our Jewellery E-Catlogue

आमच्या परिवाराचा आधारवड हरपला

दादा, तुमच्या आठवणींचा ठेवा आयुष्यभर हृदयात जपून ठेवू



॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

चंदनापुरी येथील शेतकरी कुटुंबात कै. किसन राजाराम राहणे यांच्या पोटी सर्वांत मोठा मुलगा म्हणून पुंजा किसन राहणे (दादा) यांचा जन्म १ जानेवारी १९४९ रोजी झाला. नुकतेच २८ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने राहणे परिवाराचा आधारवड कोसळला असून, आमच्या आयुष्यात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. आम्ही सर्वजण त्यांना प्रेमाने 'दादा' म्हणत असू. आई-वडील, पाच बहिणी आणि एक भाऊ असा त्यांचा मोठा परिवार होता. कुटुंबातील सर्वांत मोठे असल्याने लहान वयातच त्यांच्यावर जबाबदाऱ्यांचे ओझे आले. शेतकरी कुटुंबातील परिस्थितीमुळे त्यांचे शिक्षण पाचवीपर्यंतच झाले. मात्र, शिक्षणापेक्षा अनुभवातून मिळालेले ज्ञान, कष्टाची शिकवण आणि जीवनमूल्ये हीच त्यांची खरी संपत्ती होती. वडील किसन राजाराम राहणे हे कष्टाळू व धार्मिक वृत्तीचे शेतकरी होते. त्यांच्याकडून दादांनी शेतीचे संस्कार आणि मेहनतीचे बाळकडू घेतले.

लहानपणापासूनच दादांनी शेतीत स्वतःला झोकून दिले. त्या काळात बैलांच्या साह्याने शेती केली जात असे. विहीर खोदणे, शेताचे बांध सपाट करणे, पिकांना पाणी देणे अशा कष्टाच्या कामांत त्यांनी आयुष्य घालवले. उत्तम बैलजोडी, शेतीची दर्जेदार अवजारे आणि बैलगाडी यांची त्यांना विशेष आवड होती. आजही त्यांनी जपून ठेवलेली शेतीची अवजारे त्यांच्या शेतीप्रेमाची साक्ष देतात. शेती ही आपली आई आहे, तीच आपला उदरनिर्वाह करते, हा त्यांचा विचार आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.


पाचही बहिणींची लग्ने चांगल्या घराण्यांत करून देत त्यांनी मोठ्या भावाची जबाबदारी समर्थपणे पार पाडली. या संपूर्ण प्रवासात पत्नी अनुसया यांनी त्यांना मोलाची साथ दिली. दोघांनी कष्ट, प्रेम, त्याग आणि विश्वासाच्या बळावर संसार फुलवला. दादांचा स्वभाव अतिशय शांत, संयमी आणि प्रेमळ होता. कोणालाही दुखावणे त्यांच्या स्वभावात नव्हते. मोठेपणाचा आव न आणता साधेपणाने जगणे, हेच त्यांचे वैशिष्ट्य होते. दादांना फारसे शिक्षण घेता आले नाही, याची खंत त्यांनी आपल्या मुलांच्या बाबतीत कधीही राहू दिली नाही. मोठा मुलगा रामदास याला एम.ए., बी.एड.पर्यंत शिक्षण देऊन शिक्षक म्हणून उभे केले. दुसरा मुलगा लक्ष्मण याला दहावीपर्यंत शिक्षण देऊन शेती व दुग्धव्यवसायात सक्षम केले. मुलगी मनीषा हिलाही दहावीपर्यंत शिक्षण दिले. नातवंडांनी उच्च शिक्षण घेऊन नोकरीत स्थिरस्थावर व्हावे, हे पाहणे त्यांच्या आयुष्यातील समाधानाचे क्षण होते. त्यांनी आम्हाला केवळ वाढवले नाही, तर प्रामाणिकपणा, कष्ट, माणुसकी आणि कुटुंबाची एकजूट यांचे संस्कार दिले.

१९८५ मध्ये त्यांनी फिलिप्स कंपनीचा रेडिओ घेतला होता. सायंकाळी संपूर्ण कुटुंब एकत्र बसून रेडिओवरील कार्यक्रम ऐकत असे. त्या छोट्या-छोट्या क्षणांतून निर्माण झालेला आनंद आज आठवणींच्या रूपाने मनात घर करून आहे. दादांच्या पाचही बहिणी त्यांना भेटण्यासाठी येत असत. भावंडांमधील प्रेम आणि आपुलकीचा धागा त्यांनी कायम जपला. मोठा मुलगा म्हणून दादांच्या जाण्याचे दुःख शब्दांत व्यक्त करणे माझ्यासाठी अत्यंत कठीण आहे. ज्या हातांनी माझे बालपण सांभाळले, ज्या मायेच्या सावलीत मी वाढलो, ज्या व्यक्तीने माझ्या आयुष्याला दिशा दिली, तोच माझा आधार आज हरपला आहे. आयुष्यात कितीही मोठे यश मिळवले, तरी वडिलांच्या आशीर्वादाची उणीव कायम जाणवणार आहे. आज घरात सर्व काही आहे, पण दादा नाहीत ही जाणीव मनाला असह्य वेदना देते. दादा, तुम्ही आयुष्यभर कष्ट केले, कुटुंबासाठी जगलात आणि आम्हाला संस्कारांची अनमोल शिदोरी दिलीत. तुमच्या त्यागाची परतफेड आम्ही कधीच करू शकणार नाही. तुम्ही दिलेले संस्कार, तुमची शिकवण आणि तुमच्या आठवणी हाच आमचा खरा वारसा आहे. तुमच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही. मात्र, तुम्ही दाखवलेल्या मार्गावर चालत राहणे, हेच तुमच्याप्रती आमचे खरे कर्तव्य असेल.

आज मनातून एकच आर्त हाक उमटते
दादा, तुम्ही परत या

तो हसरा चेहरा आता दिसणार नाही, मायेचा हात आता डोक्यावर फिरणार नाही. मनाचा तो भोळेपणा, कधीच केला नाही मोठेपणा. कष्टांतून उभे केले घर, तुमच्याविना झाले आज पोरके. अचानक निघून गेला प्राण, आठवणींनी भरले मन. पुनर्जन्म घ्यावा हीच आमची प्रार्थना, तुमच्या चरणी अर्पण करतो भावपूर्ण श्रद्धांजली. दादा, तुम्ही आमच्यात नसाल, पण आमच्या प्रत्येक श्वासात, प्रत्येक आठवणीत आणि प्रत्येक संस्कारात कायम जिवंत राहाल.

– आर. पी. राहणे सर (मोठा मुलगा)



दूध उत्पादकांच्या आर्थिक हिताला प्राधान्य

थोरात डेअरीकडून १७.३१ कोटींचे वितरण


मा. आबासाहेब थोरात


मा. पृथ्वीराज थोरात


मा. देवराज थोरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : एस. आर. थोरात मिल्क प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड या दूध उद्योग समूहाने दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताला प्राधान्य देत दूध दरफरक, ३१ ऑक्टोबर पर्यंतचे आगाऊ पेमेंट, वाहतूक भाडे, वितरक कमिशन, कर्मचारी पगार आणि बोनस अशा विविध माध्यमांतून एकूण १७ कोटी ३१ लाख रुपयांची रक्कम दूध उत्पादक सभासदांच्या बँक खात्यावर वर्ग केली आहे. शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळावे यासाठी गेली ३३ वर्ष समूह सातत्याने प्रयत्नशील आहे. अशी घोषणा संस्थेचे चेअरमन मा. श्री. आबासाहेब थोरात यांनी केली.

तसेच थोरात डेअरीने नेहमीच गुणवत्तापूर्ण दूध संकलन, स्वच्छता आणि पारदर्शक व्यवहारांच्या माध्यमातून शेतकरी व ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. महाराष्ट्रात दूध व दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ व बनावटपणाला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त मा. श्री. तुकाराम मुंढे साहेब यांनी केलेल्या प्रभावी कार्यवाहीमुळे शुद्ध व गुणवत्तापूर्ण दूध आणि दुग्धजन्य पदार्थांची मागणी वाढण्यास मदत झाली आहे. याचा सकारात्मक परिणाम दूध उत्पादक शेतकऱ्यांवर झाला असून, त्यांना वर्षभर उचांकी व सातत्यपूर्ण दूध खरेदी दर देण्यास शक्य झाले.

चालू आर्थिक वर्षातही दूध उत्पादनाचा खर्च आणि शेतकऱ्यांचे आर्थिक हित लक्षात घेऊन वर्षभर स्थिर व उच्च दूध खरेदी दर देण्यावर समूहाने विशेष भर दिला आहे. तसेच, शेतकऱ्यांचा पशुखाद्यावरील खर्च कमी करण्याच्या दृष्टीने २५ टक्के प्रथिने असलेले 'गगनगिरी डायमंड' आणि २२ टक्के प्रथिने असलेले 'गगनगिरी गोल्ड' हे पशुखाद्य वाजवी दरात उपलब्ध करून देण्यात आले आहे.

बैठकीस संबोधित करताना संस्थेचे संचालक श्री. पृथ्वीराज थोरात यांनी सध्या निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे पाणीटंचाई, जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध करणे आणि पशुधनाचे आरोग्य जपणे ही शेतकऱ्यांसमोरील प्रमुख आव्हाने असल्याचे नमूद केले. सद्यस्थितीतील दुष्काळाचे परिणाम केवळ पुढील पावसाळ्यापर्यंत मर्यादित न राहता शेतीचे उत्पादन पूर्वपदावर येऊन संपूर्ण कृषी उत्पादन चक्र सुरळीत होईपर्यंत जाणवू शकतात. मागील काही वर्षांतील अनुभव पाहता, एका दुष्काळी हंगामाचा परिणाम सलग दोन हंगामांवर झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी दीर्घकालीन परिस्थितीचा विचार करून जनावरांसाठी पाणी व चारा नियोजन, पशुसंवर्धन आणि उपलब्ध शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे नियोजन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

संचालक मा. श्री. देवराज थोरात यांनी माहिती देताना दुग्धव्यवसायातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढावा आणि पशुपालकांना शास्त्रीय पद्धतीने मार्गदर्शन मिळावे, यासाठी उद्योग समूहा मार्फत जनावरांचे संगोपन, योग्य आहार व्यवस्थापन, आरोग्याची काळजी आणि दूध उत्पादनवाढ याविषयी माहितीपर व्हिडिओ तयार करून सर्व सोशल मीडिया माध्यमांवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. शासनाच्या विविध योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी समूहाचे 'मी शेतकरी' आणि 'संकलन पॉइंट' या पच्या माध्यमातून महत्त्वाचे अपडेट्स दिले जात आहेत.

दिवाळीच्या शुभेच्छा : एस. आर. थोरात डेअरी च्या वतीने सर्व दूध उत्पादक शेतकरी बांधव, पशुवैद्यकीय डॉक्टर तसेच दुग्धव्यवसायाशी संबंधित सर्व घटकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा! सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि भरभराट नांदो, अशी सदिच्छा संस्थेचे चेअरमन यांनी व्यक्त केली.

मेडिकव्हर हॉस्पिटलतर्फे ग्रामिण रुग्णालय घुलेवाडी येथे सहा बॅरिकेटस्



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ग्रामीण रुग्णालय, घुलेवाडी (ता. संगमनेर) येथे रुग्णालय परिसरात वारंवार होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता वाहतूक नियंत्रणासाठी बॅरिकेड्सची आवश्यकता असल्याचे ग्रामीण रुग्णालयाचे मेडिकल ऑफिसर डॉ. राजकुमार जऱ्हाड यांनी मेडिकव्हर हॉस्पिटलकडे व्यक्त केले होते. ही गरज लक्षात घेऊन मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेरच्या सेंटर हेड डॉ. स्नेहल गायके यांच्या पुढाकारातून ग्रामीण रुग्णालय, घुलेवाडी येथे वाहतूक नियंत्रणासाठी सहा बॅरिकेड्स प्रदान करण्यात आले.

या उपक्रमामुळे ग्रामीण रुग्णालय परिसरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत होण्यास मदत होणार असून रुग्ण, त्यांचे नातेवाईक तसेच रुग्णालयातील आरोग्य कर्मचाऱ्यांनाही याचा लाभ होणार आहे. या प्रसंगी ग्रामीण रुग्णालयाचे मेडिकल ऑफिसर डॉ. राजकुमार जऱ्हाड, डॉ. राहुल पारधी, तसेच ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी कैलास चव्हाण, शब्बीर शेख, वाडेकर सिस्टर व नर्सिंग स्टाफ उपस्थित होते. मेडिकव्हर हॉस्पिटलच्या वतीने सेंटर हेड डॉ. स्नेहल गायके, सुशील टोकसे, दिपक जाधव, सुशील रोहकले आणि संतोष गोडसे उपस्थित होते. विशेष म्हणजे, मागील महिन्यात गणेशोत्सवाच्या शुभमुहूर्तावर मेडिकव्हर हॉस्पिटलतर्फे संगमनेर पोलीस स्टेशनलाही वाहतूक व गर्दी नियंत्रणासाठी बॅरिकेड्स प्रदान करण्यात आले होते. याचबरोबर परिसरातील विविध सामाजिक गरजा ओळखून मेडिकव्हर हॉस्पिटलच्या वतीने वेळोवेळी असे विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येतात.

मेडिकव्हर हॉस्पिटल नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत समाजाच्या विविध गरजांसाठी मदत व सहकार्य करण्यास तत्पर असते. आरोग्यसेवेबरोबरच सामाजिक उत्तरदायित्व जपत समाजहितासाठी असे उपक्रम यापुढेही सातत्याने सुरू राहतील, असे मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेरच्या वतीने सांगण्यात आले.

शंभर वर्षांचा विश्वास, शुद्धतेची परंपरा

दंडे गोल्ड अँड डायमंड्सचा सुवर्णप्रवास!

परंपरेचा वारसा, आधुनिकतेची जोड आणि ग्राहकांच्या विश्वासाला सर्वोच्च प्राधान्य देत सुवर्णविश्वात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे दंडे गोल्ड अँड डायमंड्स!

सोने हा केवळ मौल्यवान धातू नाही, तर प्रत्येक कुटुंबाच्या भावना, संस्कृती, परंपरा आणि आयुष्यातील अविस्मरणीय क्षणांशी जोडलेला अनमोल ठेवा आहे. लग्नसोहळा असो, सण-उत्सव असोत किंवा आयुष्यभर जपून ठेवावी अशी एखादी खास आठवण; प्रत्येक प्रसंगी सोन्याचे दागिने आनंदाला अधिक झळाळी देतात. अशा या सुवर्णविश्वात शुद्धता, विश्वास आणि दर्जेदार सेवेला प्राधान्य देत दांडे गोल्ड अँड डायमंड्सने आपल्या प्रदीर्घ परंपरेचा ठसा उमटवला आहे.

परंपरेचा वारसा, विश्वासाची शिदोरी

सन १९२७ पासून सुरू झालेला हा प्रवास म्हणजे काळानुसार बदलत गेलेल्या सुवर्णव्यवसायाची आणि ग्राहकांशी जपलेल्या विश्वासाच्या नात्याची कहाणी आहे. जवळपास शतकभराच्या या परंपरेत गुणवत्ता, पारदर्शक व्यवहार आणि ग्राहकांचे समाधान यांना महत्त्व देण्यात आले आहे. बदलत्या काळानुसार आधुनिकतेची कास धरतानाच पारंपरिक मूल्ये जपण्याचा प्रयत्न या सुवर्णदालनाच्या वाटचालीत दिसून येतो.

दागिन्यांचे वैविध्यपूर्ण आणि आकर्षक विश्व

दंडे गोल्ड अँड डायमंड्समध्ये ग्राहकांच्या आवडीनिवडींना अनुरूप दागिन्यांची विस्तृत श्रेणी उपलब्ध आहे. २४, २२, १८, १४ आणि ९ कॅरेटमधील सोन्याचे दागिने, आकर्षक हिऱ्यांचे दागिने, ९२.५ शुद्धतेच्या चांदीचे दागिने, नवरत्ने आणि चांदीच्या भेटवस्तू व पूजासाहित्य अशा विविध पर्यायांमुळे प्रत्येक खरेदीला खास स्वरूप प्राप्त होते.

कंपनीच्या माहितीनुसार, सोन्याच्या दागिन्यांचे ३५ हजारांहून अधिक, हिऱ्यांच्या दागिन्यांचे ५ हजारांहून अधिक आणि चांदीच्या दागिन्यांचे १० हजारांहून अधिक डिझाइन्स उपलब्ध आहेत. पारंपरिक कलाकुसरीपासून आधुनिक फॅशनपर्यंत आणि दैनंदिन वापरापासून खास समारंभांपर्यंत, विविध गरजांसाठी येथे दागिन्यांचे पर्याय मिळतात. 'मागीना' या संग्रहातून महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि कलात्मक वारसा दागिन्यांच्या माध्यमातून साकारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

शुद्धतेला प्राधान्य, व्यवहारात पारदर्शकता

सोन्याचे दागिने खरेदी करताना ग्राहकांसाठी शुद्धता आणि विश्वासार्हता या सर्वाधिक महत्त्वाच्या बाबी असतात. सर्व दागिने इखड हॉलमार्क प्रमाणित असल्याचे कंपनीच्या पुस्तिकेत नमूद करण्यात आले आहे. जुन्या दागिन्यांच्या देवाणघेवाणीच्या वेळी ० टक्के घट या सुविधेचाही उल्लेख आहे. ग्राहकांना खरेदीचा विश्वासार्ह अनुभव देण्याच्या दृष्टीने या बाबींना महत्त्व आहे.

ग्राहकांसाठी बचत आणि विशेष लाभ

दागिन्यांची खरेदी अधिक नियोजनबद्ध करण्यासाठी 'सौभाग्यलक्ष्मी' योजनेचा पर्याय मांडण्यात आला आहे. नियमित बचतीच्या माध्यमातून भविष्यातील दागिन्यांच्या खरेदीचे नियोजन करता येते. त्याचबरोबर 'डेरश्रीं+' कार्यक्रमाद्वारे ग्राहकांना खरेदीवर लॉयल्टी पॉइंट्स मिळवून पुढील खरेदीत सवलतीचा लाभ घेण्याची संधी दिली जाते. या कार्यक्रमाशी १ लाख ४५ हजारांहून अधिक ग्राहक जोडले गेले आहेत.

व्यवसायासोबत सामाजिक बांधिलकी

व्यवसायाची प्रगती साधतानाच समाजाप्रती असलेली जबाबदारी जपण्यावरही भर देण्यात आला आहे. 'गोविंद दंडे फाउंडेशन'च्या माध्यमातून शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवले जातात. ५ हजारांहून अधिक वह्या-पुस्तकांचे वाटप, ६०० हून अधिक बचत गट व शैक्षणिक संस्थांना मदत आणि ७० हून अधिक दुष्काळग्रस्त गावांमध्ये पाणीवाटप केले आहे.



याशिवाय, नाशिक रोड शाखेतील 'ऐवज' दागिन्यांचे संग्रहालय हा दागिन्यांचा इतिहास आणि पारंपरिक कलाकुसर जतन करण्याचा विशेष उपक्रम आहे.

संगमनेरमध्येही सुवर्णसेवेचा विश्वास

नाशिक रोड, नाशिक, सिन्नर आणि संगमनेर येथे शाखांच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहोचणारे दंडे गोल्ड अँड डायमंड्स हे परंपरा, गुणवत्ता, आधुनिक डिझाइन्स आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम साधणारे सुवर्णदालन म्हणून आपली ओळख अधोरेखित करते. हिच ओळख आता संगमनेरकरांची देखील होत आहे. नाशिक रोड, टॉपटेन कॉम्प्लेक्स मध्ये अद्ययावत शाखा देखील सुरू झाली आहे.

शतकभराचा वारसा, दागिन्यांतील वैविध्य आणि विश्वासाच्या नात्याला दिलेले महत्त्व यांची सांगड घालत दांडे गोल्ड अँड डायमंड्सचा सुवर्णप्रवास पुढे जात आहे. कारण खऱ्या अर्थाने मौल्यवान असते ते केवळ सोन्याचे मूल्य नव्हे, तर त्या सोन्याशी जोडलेला विश्वास, भावना आणि नात्यांचा अनमोल ठेवा!

संजय आहिरे
उपसंपादक दैनिक युवावार्ता



पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

अंजनी
होम अप्लायन्सेस सर्व्हिस
प्रो.प्रा दिपक दुस्सा
Mo. 9970256292
7588540906
तत्काळ दुरुस्ती सेवा | चांगल्या प्रतिची हमी | योग्य दरात सेवा | घरी येऊन दुरुस्ती
आमच्या कडे सर्व प्रकारच्या घरगुती वापरातील वस्तु मिक्सर, फॅन,गॅस,गिझर,गॅस शेगडी,भट्टी इतर वस्तु विक्री व दुरुस्ती करुन मिळेल.
अकोलकर कॉम्प्लेक्स, दिवेकर गॅस समोर मालदाड रोड, संगमनेर

संस्कारांतूनच जीवनात परिवर्तनाची प्रेरणा मिळते - कळसकर गुरुजी

डॉ. सुदीप हासे यांचा मराठा पतसंस्थेतर्फे सन्मान



संगमनेर - आई-वडिलांकडून मिळालेले चांगले संस्कार आणि विचार यांमुळे मुलांच्या जीवनाला योग्य दिशा मिळते. अशा संस्कारांतूनच मुले समाजापुढे आदर्श निर्माण करणारी कामगिरी करतात. इंजि. डॉ. सुदीप किसनराव हासे हे त्याचे उत्तम उदाहरण आहेत. त्यांनी उद्योग-व्यवसायात यश संपादन करतानाच उच्च शिक्षणाची जिद्द कायम ठेवून पीएच. डी. पदवी मिळवली. त्यांच्या या यशातून संस्कार, संघर्ष आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित होते. असे प्रतिपादन सोमनाथ कळसकर गुरुजी यांनी केले. मराठा पतसंस्था, अहिल्यानगरच्या संगमनेर शाखेतर्फे युवा उद्योग समूहाचे संचालक डॉ. सुदीप हासे यांचा कळसकर गुरुजी यांच्या हस्ते सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते.

डॉ. सुदीप हासे यांनी युवा उद्योग समूहाच्या माध्यमातून उद्योग-व्यवसाय यशस्वीपणे उंचीवर नेला आहे. व्यवसायात उल्लेखनीय यश मिळवतानाच त्यांनी आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावत मशिन लर्निंग, डीप लर्निंग आणि क्लाऊड कॉम्प्युटिंग या आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात ओरिएंटल युनिव्हर्सिटी, इंदूर येथून पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. व्यवसायात यशस्वी होण्यासाठी अनेक बाबींचा सखोल अभ्यास, नियोजन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असतात. त्यातूनच खऱ्या अर्थाने यश मिळते, असेही कळसकर गुरुजी म्हणाले.

किसन भाऊ हासे यांच्या परिवाराचा संघर्ष आपण जवळून पाहिला असल्याचे सांगून कळसकर गुरुजी म्हणाले की, या परिवारातील मुलांनी बुद्धिमत्ता, उच्च शिक्षण आणि मोठी स्वप्ने पाहण्याची जिद्द यांच्या जोरावर प्रगती साधली आहे. केवळ स्वप्ने पाहून चालत नाही तर ती पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम घ्यावे लागतात. हासे परिवाराने हे आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे.

पतसंस्थेचे संचालक काशिनाथ डोंगरे यांनीही डॉ. हासे यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले की, हासे सर आणि माझे अनेक वर्षांपासून जिव्हाळ्याचे संबंध आहेत. या परिवाराला मी जवळून ओळखतो. जीवनात परिवर्तन घडण्यासाठी कधी संधी मिळते, तर कधी संकटांना सामोरे जावे लागते. मात्र, या भावांनी संकटांचे संधीत रूपांतर करून आपल्या कर्तृत्वाची ताकद कामातून सिद्ध केली आहे. सत्काराला उत्तर देताना डॉ. सुदीप हासे म्हणाले की, २०१८ मध्येच पीएच.डी. करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, नोकरी सोडून व्यवसाय क्षेत्रात प्रवेश केल्यामुळे या प्रवासाला काहीसा उशीर झाला. कोणतेही ध्येय साध्य करण्यासाठी संघर्ष, जिद्द आणि संयम या गोष्टी आवश्यक आहेत. या गुणांच्या जोरावर संकटातही यश मिळवता येते आणि संधीचेही सोने करता येते. मात्र, संघर्षातून मिळालेल्या यशातून मिळणारे समाधान हे शब्दांत किंवा मोजमापात व्यक्त करता येत नाही. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवश्री अशोक नवले सर यांनी केले. यावेळी हांडे सर यांनी मनोगत व्यक्त करून डॉ. हासे यांच्या यशाचे कौतुक केले. उपस्थितांचे आभार मराठा पतसंस्थेचे शाखाधिकारी अशोक अरगडे यांनी मानले.

थोरात कारखान्याकडून दीपावली निमित्त २२ कोटी ११ लाख रुपये बँकेत वर्ग



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा राज्याचे माजी महसूल व कृषिमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने कायम नागरिकांच्या जीवनात आनंद निर्माण केला आहे. यावर्षी दीपावलीच्या निमित्ताने २२ कोटी ११ लाख रुपये बँकेत वर्ग केले असल्याने संगमनेरच्या बाजारपेठेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले असल्याची माहिती कारखान्याचे व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना कारखान्याचे व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श तत्त्वावर संगमनेरच्या सहकाराची आणि कारखान्याची वाटचाल सुरू आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी कायम सभासद, शेतकरी, ऊस उत्पादक, सर्वसामान्य नागरिक कामगार यांचे हित जोपासले आहे. दीपावलीच्या निमित्ताने कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांना २०० रुपये प्रति टन अनुदान दिले आहे तर कामगारांना २०% बोनस व ३० दिवसांचे सानुग्रह अनुदान दिले आहे. दीपावलीच्या निमित्ताने अमृत उद्योग समूह, कारखाना व विविध संस्थांच्या माध्यमातून बाजारपेठेमध्ये पैसे येतात त्या माध्यमातून मोठी आर्थिक उलाढाल होत असते.

दीपावलीच्या निमित्ताने कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांचे अनुदान, शेअर्स ठेवींवरील व्याज, दीपावली साखर,पेमेंट या माध्यमातून १२ कोटी ११ लाख रुपये तर कामगारांचा बोनस १० कोटी असे २२ कोटी ११ लाख रुपये बँकेत वर्ग करण्यात आले आहे. यामुळे संगमनेरच्या बाजारपेठेमध्ये मोठी आर्थिक उलाढाल होणार आहे. दरवर्षी इतर शहरांच्या तुलनेमध्ये संगमनेर मध्ये खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी असते विश्वसनीय बाजारपेठ म्हणून संगमनेरची ओळख आहे. अमृत उद्योग समूहातील विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जातात आणि तेच पैसे पुन्हा बाजारपेठेत येतात. त्यामुळे व्यापाराचे चक्र फिरते आणि आर्थिक उलाढाल होते.

कारखान्याबरोबरच इतर सहकारी संस्थाही पगार व इतर देणे बँकेत वर्ग करणार असल्याने दिवाळीच्या तालुक्यातील शेतकरी,नागरिक,युवक,व्यापारी यांच्यामध्ये मोठे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. दिवाळीला शेतकऱ्यांसाठी पेमेंट वर्ग केल्याने शेतकरी,व्यापारी,उत्पादक व कामगार यांनी कारखान्याचे मार्गदर्शक लोकनेते बाळासाहेब थोरात सर्व संचालक मंडळ कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांचे अभिनंदन केले आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना व अमृत उद्योग समूहातील सर्व संस्थांनी कायम शेतकरी सभासद सर्वसामान्य नागरिक महिला व युवक यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचे काम केले असून दिवाळीच्या निमित्ताने ही रक्कम बँकेत वर्ग केली आहे. यामुळे बाजारपेठेत मोठी आर्थिक उलाढाल होणार असल्याने व्यापाऱ्यांमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी म्हटले आहे.

दुष्काळग्रस्त कुटुंबांची दिवाळी गोड करण्यासाठी एकनाथ शिंदे यांचा पुढाकार



युवावार्ता (प्रतिनिधी)

दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना संगमनेर तालुक्यातील शेतकरी दुष्काळाच्या गंभीर संकटाचा सामना करीत आहेत. शेतकऱ्यांच्या हाताला काम नाही, शेतीतून उत्पन्न मिळालेले नाही, तर दुसरीकडे पाणीटंचाईचे संकटही दिवसेंदिवस तीव्र होत आहे. अशा परिस्थितीत बळीराजा, शेतमजूर, कष्टकरी कामगार आणि सर्वसामान्य गोरगरीब कुटुंबांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुष्काळग्रस्त भागातील गरजू कुटुंबांसाठी दिवाळीचा शिधा उपलब्ध करून दिला आहे. हा शिधा तालुक्यातील गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचविण्याचे काम सुरू असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली. हिवरगाव पठार येथील गिऱ्हेवाडी, पायरवाडी आणि सुतारवाडी येथील आदिवासी कुटुंबांना दिवाळी शिध्याचे वाटप करण्यात आले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात आमदार खताळ बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भाजपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब खेमनार, तालुकाध्यक्ष गुलाब भोसले, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष रऊफ शेख, खांबा गावचे सरपंच रवी दातीर, श्री. गोंदके, इसाक पटेल, राजू गोसावी, गणेश कांबळे, तुषार करंजकर, संकेत खेमनार, पांडुरंग धुमाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार खताळ म्हणाले की, दिवाळी हा आनंदाचा आणि उत्साहाचा सण आहे. मात्र, यंदा तालुक्यातील अनेक गावांमध्ये दुष्काळाची तीव्रता वाढली आहे. शेतकऱ्यांच्या हाताला काम नसल्याने आणि शेतीतून उत्पन्न मिळाले नसल्याने अनेक कुटुंबांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत कष्टकरी आणि गोरगरीब कुटुंबांची दिवाळी अंधारात जाऊ नये, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. हीच जाणीव ठेवून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुष्काळग्रस्त भागातील गरजू कुटुंबांसाठी दिवाळीचा शिधा पाठविला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलविण्याचा प्रयत्न केला जात आहे. दिवाळीचा हा शिधा तालुक्यातील प्रत्येक गरजू कुटुंबापर्यंत पोहोचला पाहिजे. कोणतेही कुटुंब मदतीपासून वंचित राहता कामा नये. यासाठी शिवसेनेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी गावागावांत लक्ष देऊन गरजू कुटुंबांपर्यंत शिधा पोहोचवावा, असे आवाहनही आमदार खताळ यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाच्या माध्यमातून लवकरच पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करण्यात येणार आहेत.



चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165



कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग: अतिदक्षता विभाग • अपघात विभाग
डायलिसीस विभाग: सुपर स्पेशालिटी विभाग • न्यूरोविभाग
हृदयरोग विभाग: मेडिसीन विभाग • अद्ययावत कॅथलॅब
जॉईंट रिप्लेसमेंट: स्पाईन सर्जरी • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist

डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

शैक्षणिक क्रांतीचा तरुण शिल्पकार - डॉ. हर्षवर्धन गुंजाळ

संगमनेरच्या मातीला सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि शैक्षणिक निष्ठेचा मोठा वारसा लाभला आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. नामदेवराव गुंजाळ यांच्या कृतीशील संस्कारांतून आकाराला आलेले तरुण, ध्येयवादी आणि तडफदार नेतृत्व म्हणजेच डॉ. हर्षवर्धन गुंजाळ! आज डॉ. हर्षवर्धन यांचा वाढदिवस. दोन मोठ्या बहिणींच्या पाठीवर जन्मलेला हर्षवर्धन लहानपणापासूनच घरातील सर्वांचा अत्यंत लाडका. बालवाडीचे पहिले वर्ष 'स्ट्रॉबेरी बालवाडी'त, तर केजीपासून ११वीपर्यंतचे शिक्षण 'ध्रुव अॅकेडमी'त झाले.

१०वीत असतानाच त्याने वैद्यकीय क्षेत्रात जाण्याचा ठाम संकल्प केला. NEET च्या तयारीसाठी कोटा किंवा लातूरला जाण्याची त्याची मनीषा होती; परंतु वडिलांनी त्याला संगमनेरच्या मातीशी जोडून ठेवले. अकरावी ध्रुव अॅकेडमीत पूर्ण करून १२वीला नाशिक येथे राहून त्याने NEET ची तयारी केली. दुर्दैवाने नीटमध्ये अपेक्षित गुण न मिळाल्याने एमबीबीएसचे स्वप्न हुकले. पण, अपयश ही पराभवाची सुरुवात नसून नव्या संघर्षाची नांदी असते हा विचार मनात ठेवून त्याने खचून न जाता 'एसएमबीटी दंत महाविद्यालय' येथे बीडीएससाठी प्रवेश घेतला.

वैद्यकीय शिक्षण सुरू असतानाच हर्षवर्धनच्या संवेदनशील मनाला एका प्रश्नाने अस्वस्थ केले आपल्या संगमनेर तालुक्यातील आणि ग्रामीण भागातील शेतकरी, कामगारांच्या मुलांना NEET/JEE च्या तयारीसाठी लाखो रुपये खर्च करून कोटा किंवा लातूरला किंवा नाशिक पुणे सारख्या मोठ्या शहरात का जावा लागावे?

याच एका ध्येयवेड्या विचारातून



संगमनेरमध्येच आंतरराष्ट्रीय दर्जाची इन्स्टिट्यूट उभी करण्याचा क्रांतिकारी निर्णय त्याने घेतला. मुलाचा संकल्प आणि तळमळ पाहून डॉ. नामदेवराव गुंजाळ यांनी संगमनेर येथील नवीन नगर रोड वरील आपली जागा उपलब्ध करून दिली. केवळ दोन विद्यार्थ्यांपासून सुरू झालेली ही इन्स्टिट्यूट संपूर्ण महाराष्ट्राच्या शैक्षणिक पटलावर 'व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट' या नावाने एका वटवृक्षासारखी दिमाखात उभी आहे.

नवीन नगरची जागा अपुरी पडू लागताच, डॉ. हर्षवर्धन यांनी शिवबाबा हाइट्स (कॉलेज रोड, विजय नागरी पतसंस्थेशेजारी) येथे २४,००० स्क्वेअर फूटची भव्य आणि अद्ययावत जागा उभारली. आज संगमनेरच्या इतिहासात पहिल्यांदाच देशातील सर्वोत्तम डिजिटल तंत्रज्ञान, वातानुकूलित अभ्यासिका, समृद्ध ग्रंथालय आणि देशभरातून आलेल्या नामांकित प्राध्यापकांची टीम एकाच छताखाली कार्यरत आहे. 'लातूर पॅटर्न' किंवा 'कोटा पॅटर्न'च्या धर्तीवर स्वतःचा 'संगमनेर पॅटर्न' निर्माण करण्याचा डॉ. हर्षवर्धन यांचा ध्यास आज प्रत्यक्ष साकारताना दिसत आहे.

केवळ शिक्षण नाही, तर संवेदनशील सामाजिक भान

डॉ. हर्षवर्धन यांनी इन्स्टिट्यूटला केवळ व्यावसायिक केंद्र बनू दिले नाही, तर तिला संवेदनशीलतेची जोड दिली. आजच्या स्पर्धात्मक आणि प्रगत युगात डॉक्टर, इंजिनिअर, प्रशासकीय अधिकारी (ख-ड/खझड) किंवा विविध उच्च व्यावसायिक क्षेत्रांत यश मिळवण्यासाठी केवळ शालेय अभ्यासक्रम पुरेसा ठरत नाही, तर शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता, तार्किक विचार (डेसळलरश्र ठशरीपळपस), आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होणे आवश्यक आहे. पालकांच्या विशेष आग्रहस्तव व विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी 'व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट'च्या वतीने यंदापासून हा विशेष फाउंडेशन कोर्स डॉक्टर हर्षवर्धन गुंजाळ यांच्या पुढाकारातून सुरू केला आहे. त्यामुळे अनेक पालक समाधान व्यक्त करताना दिसतात.जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून परिसरातील १०० गुणवंत शिक्षिकांना पद्मश्री डॉ. कल्पना सरोज यांच्या हस्ते 'आदर्श शिक्षिका पुरस्कार' देऊन सन्मानित केले. इन्स्टिट्यूटमधील एका विद्यार्थ्याला परीक्षेच्या काळात दातांच्या त्रासामुळे मुंबईत जाऊन दाताची शस्त्रक्रिया करावी लागली आणि त्याचे शैक्षणिक नुकसान झाले. ही गोष्ट ओळखून, ऐन परीक्षेच्या काळात कोणत्याही विद्यार्थ्याचे असे नुकसान होऊ नये म्हणून त्यांनी एसएमबीटी दंत महाविद्यालयातील सहकार्यांच्या मदतीने सर्व विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी करून घेतली.

'विद्या विद्यापीठ या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून तज्ञ प्राध्यापकांची टीम तयार करून १०० हून अधिक शाळांमध्ये दहावीच्या मुलांसाठी मोफत परीक्षा व करिअर मार्गदर्शन शिबिरे दर वर्षी घेतली जातात. ग्रामीण भागातील मुलांमध्ये अभ्यासाची व स्पर्धेची गोडी निर्माण व्हावी, म्हणून १०० शाळांमध्ये स्कॉलरशिप परीक्षा घेऊन प्रथम आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला सायकल बक्षीस देऊन प्रोत्साहित केले. व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट मध्ये स्कॉलरशिपही दिली.

ज्या जिद्दीने आणि नियोजनाने डॉ. हर्षवर्धन रात्रंदिवस कष्ट घेत आहेत, त्याचे सुवर्णफळ या वर्षी संगमनेरकरांनी पाहिले! व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटच्या १६ विद्यार्थ्यांपैकी ३ विद्यार्थ्यांनी थेट देशातील सर्वोच्च अशा खखढ (भारतीय तंत्रज्ञान संस्था) मध्ये प्रवेश मिळवून इतिहास घडवला! ग्रामीण भागातील मुलांच्या डोळ्यांत आयआयटी आणि वैद्यकीय महाविद्यालयांचे स्वप्न पेरून ते सत्य उतरवणारा हा जादूगार म्हणजे डॉ. हर्षवर्धन गुंजाळ आहेत.

जिद्द, चिकाटी, कठोर परिश्रम आणि सामाजिक भान असणारा डॉ. हर्षवर्धन हा संगमनेर आणि परिसरातील प्रत्येक तरुण विद्यार्थ्यासाठी प्रेरणास्रोत आहे. आपल्या कर्तृत्वाने संगमनेरच्या शैक्षणिक क्षितिजावर 'व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट चा सुवर्णध्वज फडकवणाऱ्या डॉ. हर्षवर्धन गुंजाळ यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! त्यांच्या हातून अशीच निरंतर शैक्षणिक क्रांती घडो, हीच सदिच्छा!

किसन भाऊ हासे
संस्थापक, दैनिक युवावार्ता, संगमनेर

सतेज गंधे यांना मानाचा 'प्राईम सर्कल अवॉर्ड'



संगमनेर : म्युच्युअल फंड गुंतवणुकीच्या माध्यमातून आर्थिक साक्षरता वाढविणे तसेच अधिकाधिक लोकांपर्यंत गुंतवणुकीविषयी जागरूकता पोहोचविण्यासाठी उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सतेज शशांक गंधे यांना 'प्राईम सर्कल अवॉर्ड' प्रदान करून गौरविण्यात आले. प्रुडंट कॉर्पोरेट डव्हायझरी सर्विसेस आणि फंड्स बाजार यांच्या वतीने हा सन्मान देण्यात आला.

सतेज गंधे हे एएमएफआय नोंदणीकृत म्युच्युअल फंड वितरक असून, 'गंधे इन्व्हेस्टमेंट सर्विसेस'च्या माध्यमातून ते ग्राहकांना म्युच्युअल फंड, एसआयपी तसेच विविध गुंतवणूक पर्यायांबाबत मार्गदर्शन करतात. आर्थिक नियोजनाचे महत्त्व, गुंतवणुकीची योग्य दिशा आणि दीर्घकालीन संपत्ती निर्मिती याविषयी जनजागृती करण्यावर त्यांचा विशेष भर आहे. सामान्य नागरिकांमध्ये आर्थिक नियोजनाची सवय निर्माण व्हावी, गुंतवणुकीबाबत योग्य माहिती मिळावी आणि प्रत्येकाने आपल्या आर्थिक भविष्यासाठी सक्षम नियोजन करावे, या उद्देशाने ते सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मानाबद्दल भावना व्यक्त करताना सतेज गंधे म्हणाले की, अधिकाधिक लोकांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण व्हावी आणि प्रत्येक कुटुंबाने आपल्या आर्थिक भविष्यासाठी योग्य नियोजन करावे, हाच त्यांच्या कार्याचा मुख्य उद्देश आहे. प्राप्त झालेला हा पुरस्कार भविष्यात अधिक जोमाने आणि व्यापक स्वरूपात कार्य करण्यासाठी प्रेरणादायी ठरेल. सतेज गंधे यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल संगमनेर परिसरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



प्रस्तावना : भगवा कोणाचा आणि बाकीचे रंग कोणाचे?

आज गावागावांत, चौकाचौकांत, सार्वजनिक कार्यक्रमांत आणि सामाजिक व्यासपीठांवर भगव्या रंगाची चर्चा मोठ्या प्रमाणात होताना दिसते. भगवा म्हणजे धर्म, परंपरा, शौर्य, त्याग आणि अस्मिता, अशा वेगवेगळ्या व्याख्या केल्या जातात. भगव्या रंगाला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व नक्कीच आहे. भगवान गौतम बुद्धांच्या काषाय वस्त्रांपासून ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या भगव्या ध्वजापर्यंत या रंगाचे विविध संदर्भ आहेत. परंतु येथे एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. जर भगवा रंग गावाचा, समाजाचा आणि अस्मितेचा प्रतीक असू शकतो, तर मग हिरवा, पिवळा, लाल आणि निळा रंग गावाचा का असू शकत नाही? गावात भगवा असावा, याला विरोध करण्याचे कारण नाही. मात्र भगव्याचा सन्मान करताना इतर रंगांना दुय्यम का समजले जाते? एका रंगाचा सन्मान करताना दुसऱ्या रंगाचा अपमान का व्हावा?

१. भगवा रंग : बुद्धांपासून शिवाजी महाराजांपर्यंतचा प्रवास

भगव्या रंगाचे संदर्भ भारतीय इतिहासात अनेक ठिकाणी आढळतात. भगवान गौतम बुद्धांनी राजवैभव, संपत्ती आणि सत्तेचा त्याग करून मानवतेला करुणा, मैत्री, प्रज्ञा आणि समतेचा मार्ग दाखवला. बौद्ध परंपरेतील काषाय वस्त्र हे त्याग, साधेपणा आणि विरक्तीचे प्रतीक आहे. दुसरीकडे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासात भगव्या ध्वजाला स्वराज्य, शौर्य आणि परंपरेशी जोडले जाते. मात्र बुद्धांचा विचार केवळ वस्त्रांच्या रंगात नाही, तर त्यांच्या तत्त्वज्ञानात आहे. शिवाजी महाराजांचा इतिहास केवळ भगव्या ध्वजात नाही, तर स्वराज्याच्या संकल्पनेत, प्रशासनात, पराक्रमात आणि रयतेच्या हिताच्या विचारात आहे. बुद्धांचे काषाय वस्त्र धारण करून जर एखादा माणूस दुसऱ्याचा द्वेष करत असेल, तर त्याने बुद्धांचा विचार स्वीकारला का? शिवाजी महाराजांचा भगवा ध्वज हातात घेऊन जर एखादा माणूस सामान्य रयतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असेल, तर त्याने महाराजांच्या रयतेच्या कल्याणाचा विचार स्वीकारला का? महापुरुषांचा सन्मान त्यांच्या प्रतीकांपुरता मर्यादित नसावा. त्यांच्या विचारांचे आचरण हेच खरे महत्त्वाचे आहे.

२. हिरवा रंग : निसर्ग, शेती आणि सामाजिक अस्मिता

हिरवा रंग म्हणजे निसर्ग, शेती, समृद्धी, जीवन आणि वाढ. आपल्या गावाचा कणा असणारा शेतकरी हिरव्या शिवारात घाम गाळतो. शेतमजूर शेतीत राबतो. अन्नधान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्याचे आणि त्याच्या शेतात काम करणाऱ्या मजुराचे जीवन हिरव्या रंगाशी जोडलेले आहे. मग हिरवा रंग केवळ एखाद्या धर्माचा किंवा समुदायाचा कसा असू शकतो? हिरव्या रंगाचा खरा अर्थ समजून घ्यायचा असेल, तर शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घ्यावे लागतील. शेतमालाला योग्य भाव मिळतो का? शेतकऱ्यांचे कर्ज कमी होते का? शेतमजुरांना किमान वेतन मिळते का? भूमिहीन कुटुंबांना रोजगार आणि शेतकऱ्यांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळते का? हिरव्या रंगाचा सन्मान करायचा असेल, तर हिरवे शिवार टिकवणाऱ्या हातांचाही सन्मान झाला पाहिजे.

३. पिवळा रंग : ज्ञान, शिक्षण आणि परिवर्तन

पिवळा रंग ज्ञान, प्रकाश, ऊर्जा आणि परिवर्तनाचे प्रतीक मानला जातो. समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण हा सर्वांत महत्त्वाचा मार्ग आहे. महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षण, सामाजिक न्याय आणि बहुजनांच्या उन्नतीसाठी आयुष्यभर संघर्ष केला.

आजही अनेक गावांमध्ये गरीब आणि वंचित कुटुंबांतील मुलांना शिक्षणासाठी संघर्ष करावा लागतो. ग्रामीण भागात दर्जेदार शाळा आहेत का? विद्यार्थ्यांना वसतिगृहांची सुविधा आहे का? गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण परवडते का? स्पर्धा परीक्षांसाठी योग्य मार्गदर्शन मिळते का? मुलींच्या शिक्षणासाठी सुरक्षित वातावरण आहे का? गावात पिवळा रंग लावण्यापेक्षा प्रत्येक गरीब मुलाच्या आयुष्यात शिक्षणाचा प्रकाश पोहोचवणे अधिक महत्त्वाचे नाही का?

४. लाल रंग : कष्टकरी, कामगार आणि श्रमिकांचा संघर्ष

लाल रंगाला कामगार चळवळीचा, शोषणाविरुद्धच्या संघर्षाचा आणि श्रमिक एकजुटीचा ऐतिहासिक संदर्भ आहे. गावातील शेतमजूर, बांधकाम कामगार, वीटभट्टी कामगार, ऊसतोड कामगार, हमाल आणि रोजंदारीवर काम करणारे मजूर हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे घटक आहेत. मात्र त्यांच्या आयुष्यात वर्षभर पुरेल इतका रोजगार आहे का? योग्य मजुरी मिळते का? अपघात झाल्यास आर्थिक मदत मिळते का? आरोग्य आणि सामाजिक सुरक्षेच्या सुविधा आहेत का? त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची आणि वृद्धापकाळातील आर्थिक आधाराची जबाबदारी कोण घेणार? कामगारांच्या हातावर घट्टे आहेत; पण त्यांच्या कष्टाला समाजात योग्य प्रतिष्ठा आहे का? लाल रंगाचा खरा अर्थ समजून घ्यायचा असेल, तर श्रमाचा सन्मान आणि शोषणमुक्त समाज निर्माण करण्याची भूमिका घ्यावी लागेल.

५. निळा रंग : समता, स्वाभिमान आणि संविधान

निळा रंग भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत विशेष महत्त्वाचा आहे. तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशी, संविधानिक मूल्यांशी, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाच्या संघर्षाशी जोडला जातो. बाबासाहेबांनी केवळ एका समाजासाठी नव्हे, तर देशातील शोषित, वंचित आणि उपेक्षित घटकांच्या हक्कांसाठी संघर्ष केला. आजही गावात जातीय भेदभाव संपला आहे का? प्रत्येकाला सार्वजनिक विहिरीवर आणि मंदिरात समान अधिकार आहे का? भूमिहीन दलित कुटुंबांना जमीन मिळाली आहे का? विद्यार्थ्यांना जातीय भेदभावाशिवाय शिक्षण मिळते का? महिलांना समान प्रतिष्ठा आणि सुरक्षितता मिळते का? निळा रंग म्हणजे केवळ झेंडा नाही. तो माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देणाऱ्या विचारांचा प्रतीकात्मक वारसा आहे. निळ्या रंगाचा सन्मान करायचा असेल, तर समतेचा विचार स्वीकारावा लागेल.

६. मग गावात फक्त भगवाच का? बाकीच्या रंगांचे काय?

हा या चर्चेतील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. गाव हे कोणत्याही एका धर्माचे, जातीचे, पक्षाचे किंवा विचारसरणीचे नसते. गावात वेगवेगळ्या जातींचे, धर्मांचे, आर्थिक स्तरांचे आणि विचारांचे लोक राहतात. प्रत्येक व्यक्ती गावाच्या विकासात योगदान देते. कोणी शेतात राबते, कोणी बांधकाम करते, कोणी शिक्षण देते, कोणी व्यवसाय करते, तर कोणी सामाजिक परिवर्तनासाठी संघर्ष करते. मग गावाची ओळख एका रंगापुरती मर्यादित का असावी? भगवा लावणाऱ्यांचा अधिकार जसा महत्त्वाचा आहे, तसाच निळा, हिरवा, पिवळा आणि लाल रंग मानणाऱ्यांचाही अधिकार महत्त्वाचा आहे. लोकशाहीत एखाद्या रंगाला स्वीकारण्याचे स्वातंत्र्य आहे, तसेच दुसऱ्या रंगाला स्वीकारण्याचेही स्वातंत्र्य आहे.

७. रंगांच्या राजकारणात बहुजनांच्या मूलभूत प्रश्नांचे काय?

आज बहुजन समाजासमोर अनेक गंभीर प्रश्न आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, भटके-विमुक्त, अल्पसंख्याक आणि कष्टकरी समाजातील घटकांचे प्रश्न वेगवेगळे असले, तरी त्यांच्यात काही समान प्रश्न आहेत.

शिक्षणाचा प्रश्न : गरीब कुटुंबातील मुलांना दर्जेदार शिक्षण आणि उच्च शिक्षणाच्या संधी मिळत आहेत का?

रोजगाराचा प्रश्न : सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार मिळत आहे का? गावातील तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत का?

जमिनीचा प्रश्न : भूमिहीन कुटुंबांना जमीन, घरकुल आणि मूलभूत सुविधा मिळत आहेत का?

आरोग्याचा प्रश्न : ग्रामीण भागातील गरीब लोकांना परवडणाऱ्या आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळत आहेत का?

सामाजिक न्यायाचा प्रश्न : जातीय भेदभाव, अन्याय आणि शोषणाविरुद्ध ठोस भूमिका घेतली जात आहे का?

आरक्षणाचा प्रश्न : आरक्षणाचा लाभ खऱ्या गरजू आणि वंचित घटकांपर्यंत पोहोचतो आहे का? त्यातील त्रुटी दूर करण्यासाठी प्रयत्न होत आहेत का?

महिला आणि कामगारांचे प्रश्न : महिलांना शिक्षण, रोजगार, सुरक्षितता आणि नेतृत्वात समान संधी मिळत आहेत का? शेतमजूर आणि असंघटित कामगारांना योग्य मजुरी व सामाजिक सुरक्षा मिळते आहे का?

राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न : गावापासून विधानसभेपर्यंत बहुजन समाजातील सामान्य आणि प्रामाणिक नेतृत्वाला संधी मिळते आहे का? निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग आहे का? हे प्रश्न आज प्रत्येक गावात चर्चिले गेले पाहिजेत. कारण झेंडा उंचावल्याने समाजाचा विकास होत नाही; समाजातील शेवटच्या माणसाचे जीवनमान उंचावल्याने विकास होतो.

८. महापुरुषांचे फोटो, पुतळे आणि झेंडे विरुद्ध त्यांच्या विचारांचे आचरण

आज अनेकदा महापुरुषांच्या नावाने कार्यक्रम होतात, जयंती साजऱ्या होतात, मिरवणुका निघतात आणि मोठमोठे बॅनर लावले जातात. हे सर्व करण्याला विरोध असण्याचे कारण नाही. महापुरुषांचे स्मरण होणे आवश्यक आहे. परंतु आपण महापुरुषांचे फोटो लावतो, त्यांच्या विचारांचे आचरण करतो का?

बुद्धांचा फोटो लावतो, पण करुणा आणि मैत्री पाळतो का? शिवाजी महाराजांचा भगवा फडकवतो, पण रयतेच्या हितासाठी काम करतो का? फुले दाम्पत्यांचे नाव घेतो, पण वंचित मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करतो का? शाहू महाराजांचे स्मरण करतो, पण सामाजिक न्यायासाठी उभे राहतो का? बाबासाहेबांचा निळा झेंडा हातात घेतो, पण संविधानिक मूल्यांचे पालन करतो का? कामगारांच्या संघर्षाचा लाल झेंडा उंचावतो, पण श्रमिकांच्या हक्कांसाठी लढतो का?

९. रंगांच्या माध्यमातून समाज जोडायचा की संघर्ष निर्माण करायचा?

रंग माणसांना जोडण्यासाठी असतात की तोडण्यासाठी? भगवा मानणारा माणूस वाईट नाही. निळा मानणारा माणूस देशविरोधी नाही. हिरवा मानणारा माणूस वेगळा नाही. लाल विचारांचा माणूस शत्रू नाही. पिवळ्या रंगाशी नाते जोडणारा माणूस कमी महत्त्वाचा नाही. प्रत्येक रंगामागे वेगवेगळ्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक भावना असू शकतात. मात्र कोणताही रंग दुसऱ्या रंगाचा अपमान करण्याचे साधन बनता कामा नये. आपण गावातील चौकात कोणत्या रंगाचा झेंडा लावायचा यावर तासन्तास चर्चा करतो; पण गावात किती विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत, किती तरुण बेरोजगार आहेत, किती कुटुंबे भूमिहीन आहेत आणि किती कामगारांना योग्य मजुरी मिळत नाही, यावर चर्चा करण्यासाठी किती सभा घेतो? आपण रंगांचे राजकारण करतो, पण सामान्य माणसाच्या जगण्याचे राजकारण करतो का? हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारला पाहिजे.

१०. बहुजन समाजाला आज रंगांची नाही, तर विचारांची आणि संघटित शक्तीची गरज आहे

बहुजन समाजाला एका रंगाखाली आणण्यापेक्षा न्याय, समता, शिक्षण, रोजगार आणि सामाजिक प्रतिष्ठा या समान मुद्द्यांवर एकत्र आणणे अधिक महत्त्वाचे आहे. गावातील तरुणांनी झेंड्यांच्या वादात अडकण्यापेक्षा गावाच्या विकासासाठी एकत्र आले पाहिजे. प्रत्येक गावात पुढील विषयांवर चर्चा झाली पाहिजे :

गावातील प्रत्येक गरीब मुलाला दर्जेदार शिक्षण कसे मिळेल?

बेरोजगार तरुणांसाठी रोजगारनिर्मिती कशी होईल?

भूमिहीन आणि घरकुलापासून वंचित कुटुंबांना न्याय कसा मिळेल?

शेतमजूर आणि असंघटित कामगारांचे प्रश्न कोण सोडवणार?

महिलांना सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम कसे करणार?

जातीय सलोखा आणि सामाजिक बंधुता कशी वाढवणार?

बहुजन समाजातील प्रामाणिक नेतृत्वाला संधी कशी देणार?

संविधानिक अधिकारांची माहिती शेवटच्या माणसापर्यंत कशी पोहोचवणार?

अशा प्रश्नांवर गावात संघटितपणे काम झाले, तर प्रत्येक रंगाला सन्मान मिळेल आणि प्रत्येक समाजाला न्याय मिळेल.

निष्कर्ष : भगवा असू द्या, पण निळा, हिरवा, पिवळा आणि लालही सन्मानाने राहू द्या! आमचा भगव्याला विरोध नाही. आम्हाला भगव्याचा सन्मान आहे. पण तो सन्मान इतर रंगांचा अपमान करून मिळवण्याची गरज नाही. भगवा बुद्धांच्या त्यागाची आठवण करून देत असेल, शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची प्रेरणा देत असेल, तर निळा समतेचा, हिरवा निसर्गाचा, पिवळा ज्ञानाचा आणि लाल श्रमिकांच्या संघर्षाचा संदेश देऊ शकतो. प्रत्येक रंगाला स्वतःचे महत्त्व आहे. कोणत्याही एका रंगाला संपूर्ण समाजावर लादणे ही लोकशाहीची संकल्पना नाही. आपल्याला रंगांचा द्वेष नको, विचारांचा संवाद हवा. रंगांची स्पर्धा नको, सामाजिक न्यायाची स्पर्धा हवी. झेंड्यांची उंची मोजण्यापेक्षा सामान्य माणसाचे जीवनमान उंचावण्याची गरज आहे.

आज बहुजन समाजातील तरुणाला केवळ झेंडा नको आहे, त्याला रोजगार हवा आहे. विद्यार्थ्याला केवळ महापुरुषांचे बॅनर नको आहे, त्याला चांगले शिक्षण हवे आहे. शेतमजुराला केवळ घोषणाबाजी नको आहे, त्याला योग्य मजुरी हवी आहे. भूमिहीन कुटुंबाला केवळ अस्मितेची भाषणे नकोत, त्याला हक्काचे घर आणि जमीन हवी आहे. भगवा फडकवा, निळा फडकवा, हिरवा फडकवा, पिवळा फडकवा, लाल फडकवा; पण या सर्व रंगांच्या सावलीत सामान्य माणसाचे आयुष्य अंधारात राहता कामा नये. आपली खरी ओळख रंगावरून नाही, तर आपण समाजासाठी काय करतो यावरून ठरली पाहिजे.

शेवटी एकच प्रश्न...

गावात भगवा आहे, पण गावातील गरीब माणसाच्या आयुष्यात विकासाचा रंग कधी येणार? गावात झेंडे आहेत, पण बेरोजगार तरुणांच्या हाताला काम कधी मिळणार? महापुरुषांचे फोटो आहेत, पण त्यांच्या विचारांनुसार समाजात समता कधी निर्माण होणार? बहुजनांच्या नावाने घोषणा आहेत, पण बहुजनांच्या प्रश्नांवर प्रत्यक्ष काम कधी होणार? कारण आपल्याला केवळ रंगीत गाव नको आहे; आपल्याला समताधिष्ठित, शिक्षित, रोजगारयुक्त, न्याय्य आणि माणुसकी जपणारे गाव हवे आहे.

रंग वेगवेगळे असू द्या, पण माणुसकी एकच असू द्या.

विचार वेगवेगळे असू द्या, पण संविधानाचा सन्मान एकच असू द्या.

झेंडे वेगवेगळे असू द्या, पण सामान्य माणसाच्या न्यायासाठी संघर्ष एकच असू द्या!

प्रशांत गायकवाड, जोर्वे
मो. ९६५७४९५५७५

दुसऱ्या महाराष्ट्र पॅरा योगासन क्रीडा स्पर्धेत संगमनेर महाविद्यालयाचे उज्ज्वल यश

संस्कृती गोसावीला सुवर्ण तर हर्षदा राहणेला रौप्य पदक



युवावार्ता (प्रतिनिधी)

पुणे येथे पार पडलेल्या '२ ऱ्या महाराष्ट्र पॅरा योगासन स्पोर्ट्स चॅम्पियनशिप' मध्ये संगमनेर महाविद्यालयाच्या खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर सुवर्ण आणि रौप्य पदकाची कमाई करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

पुणे येथे १ ते ३ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या २ ऱ्या महाराष्ट्र पॅरा योगासन स्पोर्ट्स चॅम्पियनशिप स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यांमधून अनेक दिव्यांग खेळाडूंनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला होता. या अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत संगमनेर महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी आपल्या कौशल्याने आणि जिद्दीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. स्पर्धेत १७ वर्षांवरील कर्णबधिर गटात संगमनेर महाविद्यालयाची विद्यार्थिनी संस्कृती गोविंद गोसावी हिने अप्रतिम योगासनांचे प्रात्यक्षिक सादर करत सुवर्णपदक पटकावले. तसेच २० वर्षांवरील अंध गटात महाविद्यालयाची खेळाडू हर्षदा सावळाराम राहणे हिने अत्यंत चमकदार कामगिरी करत रौप्यपदक आपल्या नावावर केले.

खेळाडूंच्या या यशामध्ये मार्गदर्शक कोच शुभम शर्मा यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्यांच्या उत्कृष्ट प्रशिक्षणामुळेच खेळाडूंनी राज्यस्तरावर हे यश संपादन केले. खेळाडूंना मिळालेल्या या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन डॉ. संजय मालपाणी, सचिव डॉ. राजेंद्र लढा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड, योग विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र वामन, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. अजित कदम, राष्ट्रीय निर्णायक प्रा. सुरेखा भवर यांनी विजेत्या खेळाडूंचे विशेष कौतुक व अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

राज्यस्तरीय जंपरोप स्पर्धेत ध्रुव ग्लोबलची सुवर्णझेप

अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व; ५७पदकांची विक्रमी कमाई

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- क्रीडा क्षेत्रात यश मिळविण्यासाठी केवळ गुणवत्ता असून चालत नाही, तर त्याला कठोर परिश्रम, शिस्त, सातत्यपूर्ण सराव आणि योग्य मार्गदर्शनाची जोडही असावी लागते. याच सूत्राचा प्रत्यय ध्रुव ग्लोबल स्कूलच्या खेळाडूंनी पुन्हा एकदा आपल्या देदीप्यमान कामगिरीतून करुन दिला आहे. संगमनेर येथे आयोजित महाराष्ट्र राज्यस्तरीय प्रथम जंपरोप अजिंक्यपद स्पर्धेत ध्रुव ग्लोबल स्कूलच्या खेळाडूंनी तब्बल ५७ पदकांची लयलूट करीत क्रीडा क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला. यात १५ सुवर्ण पदकांसह २२ रौप्य आणि २० कांस्य पदकांचा समावेश असून, या नेत्रदीपक कामगिरीने शाळेच्या क्रीडा गुणवत्तेवर पुन्हा एकदा



यशाची मोहोर उमटविली आहे.

संगमनेर महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय प्रथम जंपरोप अजिंक्यपद स्पर्धेत ध्रुव ग्लोबल स्कूलच्या खेळाडूंनी अहिल्यानगर जिल्ह्याच्या संघाचे प्रतिनिधित्व केले. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या खेळाडूंशी स्पर्धा करताना ध्रुवच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन घडविले. जंप रोपसारख्या खेळामध्ये शरीराचा समतोल, चपळता, वेळेचे अचूक भान, एकाग्रता आणि कमालीचा शारीरिक ताळमेळ आवश्यक असतो. या सर्व गुणांचा सुरेख मिलाफ ध्रुवच्या खेळाडूंच्या सादरीकरणात दिसून आला. वैयक्तिक तसेच विविध गटांतील स्पर्धा प्रकारांमध्ये प्रतिस्पर्ध्यांना कडवी टक्कर देत त्यांनी पदकांवर आपले नाव कोरले.

ध्रुव ग्लोबल स्कूलने शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नेहमीच प्राधान्य दिले आहे. अभ्यासासोबतच क्रीडा, कला, सांस्कृतिक उपक्रम आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या विविध संधी उपलब्ध करुन देण्याच्या शाळेच्या भूमिकेचे प्रतिबिंब या यशातून उमटते. विद्यार्थ्यांमधील सुप्त क्रीडागुणांना व्यासपीठ मिळाल्यास ते राज्यस्तरावरही उल्लेखनीय कामगिरी करु शकतात, हे ध्रुवच्या खेळाडूंनी दाखवून दिले आहे. शाळेच्या क्रीडा व सहशालेय विभागाचे प्रमुख गिरीश टोकसे, क्रीडा प्रशिक्षक ज्ञानेश्वर भोत, कुलदीप कागडे, प्रशांत भंडारी आणि भारत पय्यावूल यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल शाळेचे चेअरमन डॉ.संजय मालपाणी, व्हा.चेअरमन गिरीश मालपाणी व मुख्याध्यापिका श्रीमती संध्या धुमाळगुंडे यांनी सर्व पदकविजेत्या खेळाडूंचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्रशिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

मुलींनी आत्मविश्वासातून स्वतःची ओळख निर्माण करावी - प्रा. दीप्ती सातपुते



संगमनेर : किशोरवय हे मुलींच्या आयुष्यातील शारीरिक, मानसिक आणि भावनिक बदलांचे महत्त्वपूर्ण वळण असते. या वयात योग्य माहिती व सकारात्मक मार्गदर्शन मिळाल्यास मुली आत्मविश्वासाने जीवनातील आव्हानांना सामोरे जाऊ शकतात. प्रत्येक मुलीने स्वाभिमान, आत्मविश्वास आणि कर्तृत्वाच्या बळावर स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करावी, असे प्रतिपादन प्राध्यापिका दीप्ती सातपुते यांनी केले.

संगमनेर येथील विद्या प्रबोधिनी संस्थेच्या आनंदवन विद्यालयात विद्यार्थिनींसाठी आयोजित विशेष आरोग्यविषयक व्याख्यानात त्या बोलत होत्या. यावेळी मुख्याध्यापिका शैलजा फटांगरे, कृष्णामाई खैरनार, कल्पना सातव, मीना खर्डे, निर्मला आहेर आदी शिक्षिका उपस्थित होत्या.

प्रा. सातपुते यांनी किशोरवयातील शारीरिक व भावनिक बदल, वैयक्तिक स्वच्छता, मासिक पाळीतील स्वच्छता, संतुलित आहार, रक्तक्षय व हिमोग्लोबिनची कमतरता याबाबत विद्यार्थिनींना सविस्तर मार्गदर्शन केले. नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि आरोग्यदायी जीवनशैलीचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गुड टच-बॅड टच, वैयक्तिक सीमांची जाणीव, अनुचित वर्तनाला विरोध करण्याचे धैर्य आणि अडचणीच्या वेळी विश्वासू व्यक्तीची मदत घेण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. तसेच मोबाईलचा अतिवापर, सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक आणि सायबर बुलिंगपासून सावध राहण्याचे आवाहन केले.

मानसिक आरोग्याविषयी बोलताना तणाव, भीती, न्यूनगंड आणि भावनिक चढ-उतार यांवर मात करण्यासाठी सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि योग्य संवाद आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. 'मुलगी आहोत' म्हणून न्यूनगंड न बाळगता मुलींनी सक्षम, स्वावलंबी, सजग आणि कर्तृत्ववान बनावे. स्वतःच्या आरोग्याची व सुरक्षिततेची काळजी घेत आत्मभान आणि स्वाभिमान जपावा, असा प्रेरणादायी संदेश प्रा. दीप्ती सातपुते यांनी दिला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका शैलजा फटांगरे यांनी केले. परिचय कल्पना सातव यांनी करून दिला. सूत्रसंचालन कृष्णामाई खैरनार यांनी केले, तर आभार मीना खर्डे यांनी मानले.

भारत हायस्कूलचे अध्यक्षांसह प्राचार्य लाचेच्या जाळ्यात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात भ्रष्टाचाराने शिरकाव केल्याचा संतापजनक प्रकार घारगाव (ता. संगमनेर) येथे उघडकीस आला आहे. महिला शिक्षिकेच्या वेतनश्रेणीचा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना भारत हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संजय दगडू राणे यांना नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बुधवारी (दि. ४) दुपारी रंगेहाथ पकडले. या प्रकरणी प्राचार्य संजय राणे (रा. संगमनेर) याच्यासह सदर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीप्रकाश चांदमलजी बोरा (रा. जुन्नर) यांच्यावर घारगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात ला आहे. प्राचार्यांच्या केबिनमध्येच झालेल्या या कारवाईने शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

घारगाव येथील रंगदास स्वामी शिक्षण विकास मंडळ संचलित भारत हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात हा प्रकार घडला. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असलेल्या एका महिला शिक्षिकेच्या एक स्तर वेतनश्रेणीचा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी प्राचार्य संजय राणे यांनी तिच्याकडे ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती..

संबंधित महिला शिक्षिकेने यापूर्वीही प्राचार्यांना पैसे दिले होते. मात्र पैशांची मागणी सुरूच राहिल्याने शिक्षिकेला वारंवार आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागत होते. अखेर या कथित लाचखोरीच्या प्रकाराला कंटाळून संबंधित शिक्षिकेने नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी करून कारवाईची योजना आखली. बुधवारी दुपारी भारत हायस्कूलच्या प्राचार्य केबिनमध्ये महिला शिक्षिकेकडून ५० हजार रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारत असताना प्राचार्य संजय राणे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. प्राचार्यांनी ही रक्कम संस्थेच्या अध्यक्षाच्या सांगण्यावरून घेतल्याची कबुली दिली. त्यामुळे दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

सणासुदीच्या काळात ऑनलाइन फसवणुकीपासून सावध राहा!

आकर्षक ऑफर्स, स्वस्त खरेदी आणि डिजिटल व्यवहारांच्या मोहात आर्थिक नुकसान होण्याचा धोका; थोडी सावधगिरी बाळगल्यास दिवाळीचा आनंद राहील सुरक्षित

दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह, खरेदी आणि नवनवीन वस्तूंची रेलचेल. सणासुदीच्या काळात बाजारपेठांमध्ये ग्राहकांची गर्दी वाढतेच; त्याचबरोबर ऑनलाइन खरेदी आणि डिजिटल आर्थिक व्यवहारांनाही मोठी चालना मिळते. मोबाईलच्या एका क्लिकवर कपडे, दागिने, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, घरगुती साहित्य आणि भेटवस्तू खरेदी करण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने नागरिकांचा ऑनलाइन खरेदीकडे कल वाढला आहे. मात्र, याच वाढत्या डिजिटल व्यवहारांचा फायदा सायबर गुन्हेगारांकडून घेतला जात आहे. आकर्षक ऑफर्स, मोठ्या सवलती, कॅशबॅक आणि बक्षिसांचे आमिष दाखवून नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्याचे प्रकार सणासुदीच्या काळात वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे दिवाळीचा आनंद साजरा करताना ऑनलाइन व्यवहारांबाबत विशेष सतर्कता बाळगणे ही काळाची गरज बनली आहे. सध्या अनेक नागरिक सोशल मीडिया, व्हॉट्सप, फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर दिसणाऱ्या जाहिरातींवर विश्वास ठेवून खरेदी करतात. नामांकित कंपन्यांच्या नावाने बनावट वेबसाइट तयार करून ग्राहकांना कमी किमतीत वस्तू देण्याचे आमिष दाखवले जाते. प्रत्यक्षात पैसे भरल्यानंतर वस्तू मिळत नाही किंवा निकृष्ट दर्जाची वस्तू पाठवली जाते. काही वेळा ग्राहकांनी पैसे भरल्यानंतर संबंधित वेबसाइट किंवा विक्रेत्याचा संपर्कच बंद होतो. त्यामुळे कोणत्याही अनोळखी वेबसाइटवरून खरेदी करण्यापूर्वी त्या वेबसाइटची सत्यता, विक्रेत्याची माहिती आणि ग्राहकांचे अभिप्राय तपासणे आवश्यक आहे.



ओटीपी आणि यूपीआय पिन सांगण्याची चूक टाळा!

